मंगळवार, ४ जुलै २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२८९
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • TUESDAY 04 JULY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-289 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5


# उलथापालथ करणाऱ्यांना जनताच जागा दाखवेल

## शरद पवार : प्रीतीसंगमावरील यशवंतराव चव्हाणांच्या स्मृतिस्थळावर नतमस्तक

आधुनिक केसरी न्यूज

**सातारा : महाराष्ट्रात उलथापालथ करण्याची भूमिका ज्याप्रवृत्तींनी घेतली, त्यात दुर्दैवाने आपले सहकारी बळी पडले. जे घडले त्यानंतर फुले, शाहू, आंबेडकर यांच्या महाराष्ट्रातील सामान्य माणूस एक वेळ उपाशी राहील, पण राज्याची सामूहिक शक्ती मजबूत केल्याशिवाय राहणार नाही. या माध्यमातून उलथापालथ करणारा जो वर्ग आहे त्यांना त्यांची योग्य जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही ,असे ठणकावून सांगतानाच वर्षभराने पुन्हा लोकांसमोर जायची संधी येईल, त्यावेळी राज्यातील लोकशाहीच्या मार्गाला, शांततेवर विश्वास असणाऱ्या शक्तींना धक्का देणाऱ्या ज्या प्रवृत्ती आहेत, त्यांना पूर्णपणे बाजूला करूया आणि पुन्हा एकदा प्रगतीशील आणि सामान्य माणसाच्या हितासाठी कष्ट करणाऱ्यांचे महाराष्ट्र राज्य निर्माण करूया, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी कराड येथे पत्रकारांशी बोलताना केले.**



सोमवारी सकाळी शरद पवार यांनी स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचे स्मृतिस्थळ असलेल्या प्रीतिसंगमावर येऊन अभिवादन केले.

यशवंतराव चव्हाण यांचे वैशिष्ट्य होते की, सामान्य माणसांचा अधिकार जतन केला पाहिजे. या राज्यात त्यांनी नवी पिढी तयार केली. जिल्ह्याजिल्ह्यात तरूणांचा संच उभा केला. या माध्यमातून महाराष्ट्राच्या प्रगतीची अखंड काळजी घेतली. आज चव्हाणसाहेब जरी आपल्यात नसले तरी त्यांनी दिलेले विचार हे तुमच्या माझ्या अंतःकरणात आहेत. त्या विचाराने पुढे जाण्याची भूमिका आपण सर्वांनी घेतली, असेही शरद पवार म्हणाले.

आज महाराष्ट्रात आणि देशात जाती-धर्मात, माणसा-माणसांत संघर्ष कसा होईल, याची काळजी घेणारा एक वर्ग आहे. महाराष्ट्र हे बंधुत्व, इमान राखणाऱ्यांचा सन्मान करणारे राज्य आहे. पण मध्यंतरीच्या कालखंडात याच महाराष्ट्रात कोल्हापूर, संगमनेर, अकोला अशा काही ठिकाणी पिढ्यानपिढ्या एकत्र राहणाऱ्या समाजात एक प्रकारची वैरभावना वाढवण्याचा प्रयत्न केला गेला. यातून जातीय दंगे झाले, जे महाराष्ट्राला शोभणारे नाहीत, अशी तीव्र नाराजीही शरद पवार यांनी व्यक्त केली. महाविकास आघाडी सरकारमार्फत राज्याची सेवा होत असताना ते सरकार या-ना-त्या पद्धतीने उलथून टाकण्याचे काम काही लोकांनी केले. केवळ महाराष्ट्रात नाही तर देशात इतर ठिकाणीही असे करण्यात आले. चुकीच्या प्रवृत्ती डोकं वर काढत आहेत. त्याच प्रवृत्तींनी छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, चव्हाणसाहेब यांच्या महाराष्ट्रात लोकशाही पद्धतीने काम करणाऱ्या राजकीय पक्षाला एक प्रकारचा धक्का देण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व जातीय आणि तत्सम विचारधारा आहेत, यातून देशाचा कारभार पुढे नेण्याचा प्रयत्न होतो, असेही ते म्हणाले.

आज गुरुपौर्णिमा आहे. त्यामुळे आजपासून संपूर्ण महाराष्ट्रात जनमानस तयार करण्यासंबंधीचा निकाल काल आम्ही घेतला. याची सुरुवात करायची असेल तर स्वर्गीय यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या समाधीशिवाय दुसरे स्थळ नाही. तुमचे, माझे, सगळ्यांचे गुरु, या पदावर जाऊन मार्गदर्शन करण्याचा अधिकार एकाच व्यक्तीला होता ती व्यक्ती म्हणजे यशवंतराव चव्हाणसाहेब. त्यांच्या स्मृतिस्थळी याठिकाणी आपण प्रचंड संख्येने आलो त्याबद्दल शरद पवार यांनी सर्वांना धन्यवाद दिले.

# विरोधी पक्षनेत्याच्या नेमणुकीचा अधिकार विधानसभा अध्यक्षांनाच : राहुल नार्वेकर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** विरोधी पक्षनेत्याचा नेमणूक करण्याचा अधिकार हा पूर्णपणे विधानसभा अध्यक्षांना आहे. हा अधिकार बजावत असताना विधानसभेचे या संदर्भात काही नियम आहेत. त्याचप्रमाणे संविधानातही या विषयी तरतुदी आहेत. या सगळ्यांचा विचार करुन, संख्याबळ बघून योग्य निर्णय घ्यावा लागेल. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सत्तारुढ पक्ष म्हणून काम करत आहे की विरोधी पक्षात काम करत आहे ? याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे, अशी प्रतिक्रिया विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिली.

महाराष्ट्राच्या राजकारणात रविवारी मोठा भूकंप घडला. विरोधी पक्षनेते अजित पवार हे थेट सत्तेत सामील झाले. त्यांच्यासह आणखी आठ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. आपल्याकडे सर्वाधिक आमदार आणि खासदारांचे बहुमत आहे, असा दावा अजित पवार यांच्याकडून करण्यात आला. पण या आमदारांची यादी आणि संख्या विधानसभेच्या अध्यक्षांपर्यंत अद्याप पोहोचलेली नाही, असे राहुल नार्वेकर यांनी स्पष्ट केले आहे. यावेळी त्यांनी सध्याच्या राजकीय घडामोडींवर सविस्तर प्रतिक्रिया दिली. विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय हा या सगळ्या बाबींचा विचार करुन, कायदेशीर तरतुदींचा विचार करुन योग्यरित्या आणि योग्य वेळेला घेतला जाईल, असे राहुल नार्वेकर यांनी सांगितले. माझ्याकडे आतापर्यंत अनेक निवेदने आली आहेत. त्यापैकी एक अपात्रतेची याचिका महाराष्ट्राचे विधानसभेचे सदस्य जयंत पाटील यांनी केली आहे, त्याची प्रत माझ्याकडे आली आहे. आ. जितेंद्र आव्हाड यांनी माझ्या निवासस्थानी ही प्रत दिली. ती मला प्राप्त झालेली नाही, असेही त्यांनी सांगितले.

# दोन हजारांच्या 76 टक्के नोटा बँकेत परत


आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारतीय रिझर्व्ह बँकेने 19 मे रोजी दोन हजार रुपयांच्या नोटा मागे घेणार असल्याचे जाहीर केले होते, त्यानंतर बँकांमध्ये दोन हजार नोटा जमा करण्यात येत आहेत. बँकांमध्ये 23 मे पासून दोन हजार रुपयांच्या नोटा जमा करण्यात येत आहेत. आतापर्यंत 2000 रुपयांच्या किती नोटा जमा झाल्यात, याची माहिती आरबीआयने दिली आहे. आरबीआयचे गर्व्हनर शक्तिकांत दास यांनी माहिती दिली की, 2000 रुपयांच्या जेवढ्या नोटा चलनात होत्या, त्यापैकी आता 76 टक्के नोटा बँकांकडे आल्या आहेत. 31 मार्च 2023 पर्यंत 3.62 लाख कोटी मूल्यांच्या 2000 रुपयांच्या नोटा बँकांमध्ये जमा झाल्या असल्याची माहिती आरबीआयने दिली. 19 मे 2023 पर्यंत 3.56 लाख कोटींच्या नोटा परत केल्या गेल्या. तेव्हापासून 30 जून 2023 पर्यंत 2.72 लाख कोटी मूल्यांच्या दोन हजारांच्या नोटा बँकेत जमा झाल्या आहेत. अशी माहिती आरबीआयने दिली. आतापर्यंत दोन हजारांच्या 76 टक्के नोटा बँकेत जमा झाल्या असल्याची माहिती आरबीआयने दिली. 2000 रुपयांच्या नोटा जमा करण्यासाठी किंवा बदलण्यासाठी अजून 3 महिन्यांचा कालावधी आहे. 30 सप्टेंबरपर्यंत 2000 रुपयांच्या नोटा जमा करता येणार आहेत.










विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


रुख्मिणी तिचा पाय हातात घेते. त्याला मलमपट्टी करते. तिच्याच घरात तिच्यासाठी भाकऱ्या बडवून तिला मदत करते. तेव्हा रुख्मिणी विचारते, ' यातला मला एखादा तुकडा दिला तरी चालेल. ' तेव्हा आवली म्हणते, ' तुकडा कशापायी ? पूर्ण भाकरीच देईन की तुला. ' यातून आवलीचा प्रेमळ स्वभावही दिसून येतो. रुख्मिणी चुलीजवळ बसून जेव्हा भाकरी करते, तेव्हा चुलीतल्या निखाऱ्याचा प्रकाश तिच्या चेहऱ्यावर पडतो. त्याने तिचा मुळातच तेजपुंज असलेला चेहरा उजळून निघतो. तिचं भाकरी करणं, भाकरी शेकणं हे कुठेही नाटकातलं वाटत नाही, इतकं ते जिवंत साकारण्यात ती आणि दिग्दर्शक दोघेही यशस्वी झाले आहेत. आवली जेव्हा घर सारवते, तेव्हाही ते नाटकातलं दृश्य वाटतच नाही. घर सारवणं नाहीतरी आजकाल कोणाला माहिती आहे ? पण आजच्या पिढीला ते यात माहिती होऊ शकेल.

आवलीचा तुकारामबुवांवर राग आहे तसाच रुख्मिणीचा सुद्धा विठ्ठलावर आहे. पंढरपुरात विठ्ठल आणि रुख्मिणीची देऊळं वेगवेगळी आहेत. विठल हा श्रीकृष्णाचाच अवतार आहे. श्रीकृष्ण जेव्हा द्वारकेला आला, तेव्हाही त्याने राधेशी असणारी प्रीती, स्नेहभाव कायमच ठेवला होता. त्यामुळे रुख्मिणी रागावून दिंडीर वनात निघून गेली होती. तोच संदर्भ इथे आहे. या कारणानेच रुख्मिणी विठ्ठलावर नाराज आहे. विठ्ठलाला आपल्यापेक्षा आपले भक्त अधिक प्रिय आहेत अशी तिची तक्रार आहे. विठ्ठलाने जेव्हा आवलीच्या पायातला काटा काढला, तेव्हा स्त्री सुलभ भावनेतून रुख्मिणी बघायला आली की कोण ही की जिच्या पायातला काटा आपला पती काढतो आहे. आवली त्याच्या भक्ताची पत्नी आहे. त्याची काळजी घेणारी ती आहे. ती गर्भार अवस्थेतही आपल्या पतीला जेवण घेऊन येते. म्हणून विठुराया रुख्मिणीला आवलीच्या घरी जाऊन तिची सेवा करायला सांगतो.

अशा या परिस्थितीत आवली आणि रुख्मिणी जवळ येतात. एकमेकींची दुःख समजून घेतात. त्यांच्यातील संवाद हृदयस्पर्शी तर आहेतच पण खूप काही सांगून जाणारे आहेत. तुकाराम बुवा घरात अजिबात लक्ष देत नाहीत. त्यांच्या स्वयंपाकघरातील डबे, भांडी रिकामी आहेत.




संगीत देवबाभळी



## आनंदी पहाट

## कुटुंबाला विभक्त होण्यापासून वाचवावे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

व्यक्तिमत्त्व, क्षमता, कौशल्य आणि वागणूक यातील फरक आपल्याला स्पष्टपणे सांगू शकतो, की वेगवेगळे लोक समान स्थितीत का वेगवेगळी भूमिका बजावतात. आपल्या परस्परांतील नातेसंबंधांना टिकवणे हे आपल्याच हातात असते. आपल्या वेगवेगळ्या भूमिकांमुळे प्रत्येकाच्या व्यक्तीमत्वात जरी बदल होत असला, तरीही त्याचा संबंध केवळ व्यावहारिकदृष्ट्या महत्वाचा असल्याचे समजून नाते टिकविण्याचे कौशल्य आत्मसात करण्याइतपत आपण निश्चितच निपुण आणि सुजाण आहोत. नाते संबंध टिकवणे हीच खरी मोठी संपत्ती ठरू शकते. त्यासाठी बांधिलकीची भावना आपल्यांत रुजणे अधिक गरजेचे असते.

करिअर, कौटुंबिक जबाबदाऱ्या, नोकरी, व्यवसाय, शिक्षण आणि प्राप्त परिस्थिती अशा अनेक कारणांमुळे दिवसेंदिवस व्यक्ती विघटन वाढत चालल्याचे दिसून येत आहे. पूर्वीची एकत्र कुटुंब पद्धती तर सर्वत्र पाहायला मिळणे आता दुरापास्त होत चालले आहे. विभक्त कुटुंब व्यवस्था देखील फार काळ बघायला मिळाली नाही; कारण त्यानंतर व्यक्ती विघटन त्वरेने घडायला लागले. ह्या व्यक्ती विघटनामुळे माणूस केवळ शरीराने वेगळे राहायला लागला असे नाही, तर तो मानसिक पातळीवर देखील स्वतंत्र आयुष्य जगू लागला. खरे तर, बांधिलकीची भावना त्यामुळेच संपुष्टात येत चालली. तन, मन आणि धन हे स्वतःच्या कुटुंबासाठी जोपर्यंत वापरले जाते; तोपर्यंत आपापल्या कौटुंबिक, जबाबदाऱ्या, कर्तव्य आणि मर्यादा जपल्या जातात. पण कुटुंबाची चौकट जेव्हा तुटते, तेव्हा त्याचे वेटोळे नाही तर वाटोळे व्हायला सुरुवात होते. एक प्रकारे आपल्या सामाजिक बांधिलकीमुळेच कुटुंबाची, नवीन नात्यांची निर्मिती होत असते. त्या दृष्टीकोनातून सामाजिक बांधिलकीचे महत्व आपल्या स्वतःसाठी आणि कुटुंबासाठी समजून घेणे जरुरीचे असते. त्यासाठी सामाजिक बांधिलकीचे भान राखणे आवश्यक असते.



आधुनिक केसरी

**माय प्रगटली | विटेवरी ||**
माय गेली गावा | झालो वनवासी ||
वेदनेच्या राशी | भाळी आल्या ||१||
जगुनी मरणे | मरूनी जगणे ||
हासने रडने | सोंग सारे ||२||
गर्दीत एकला | शिक्षा जीवघेणी ||
फिरे अनवानी | दाही दिशा ||३||
पडताच कानी | सूर अभंगाचा ||
पूर वेदनेचा | ओसरला ||४||
जळमटे सारी | जळोनिया गेली ||
माय प्रगटली | विटेवरी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

आभ्रमन् भ्रमरो गुन्जन् करोतीव जपं तव |
अभीष्टफललाभाय दुर्गां देवीं
नमाम्यहम् || ३४ ||
भ्रमर देखील जणू गुंजारव करीत तुझा जप करीत असतात. अशा तुला दुर्गा देवीला मी अभीष्टफलाच्या प्राप्तीसाठी नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**गुण त्रिलोक अणिमादिक, भोगन अति दुख लाग । वायस विट सम सो तजे, ताहि कहत वैराग ।।०४।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल षष्ठ अध्याय) ०४/०६/०४ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :** त्रिगुणांनी युक्त त्रैलोक्यसुख आणि अणिमादिक सिद्धी आहेत. त्यांचा भोग दुःखमय प्रतीत होऊ लागतो . या भोगांना कावळ्याच्या विष्ठेसमान त्यागणे याला वैराग्य म्हणतात. जेव्हा संसारातील सुखे दुःखमय प्रतीत होऊ लागतात, तेव्हा चित्त मायेची आसक्ती सोडून प्रभू भक्तीसाठी प्रवृत्त होते. संसारातील विषय जेव्हा दुःखमय भासू लागतात तेव्हा वैराग्य येते आणि प्रभूप्राप्ती ची साधना होऊ लागते. म्हणून वैराग्यवान होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्यामुळे विषय-रागातील रुची नाहीशी होऊन प्रभूभक्तीत प्रेम वाटू लागते. वैराग्यामुळे इंद्रियांचे विषयाकर्षण मंद होत जाते आणि साधनेद्वारे क्रमशः विषयांपासून विरक्त होत आत्मचेष्टा आपल्या स्वरूपात येऊन रात्रंदिवस गुरू-प्रदेशात स्थिरावते.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## स्थूलपंचमहाभूते



सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646


आधुनिक केसरी

आता आपण यासमासातील गुरू शिष्य संवादाकडे वळूया. ब्रम्हवस्ण निर्गुण आहे तशीच ती सनातन म्हणजे कायम टिकणारी आहे. आपण याआधीही पाहिले आहे की आकाशाचे सात स्वभाव धर्म आहेत.

## ऐसा करावा काही नेम । जेणे जोडेल आत्माराम

आधुनिक केसरी

ऐसा करावा काही नेम । जेणे जोडेल आत्माराम ॥ नेम असावा शाश्वताचा । जेणे राम कृपा करील साचा ॥ नेम असावा वाचा मन । जेणे संतुष्ट होईल रघुनंदन ॥ कर्तव्यात गुंतवावे शरीर । जेणे संतोषे रघुवीर ॥ सतीला नसे दुजे दैवत जाण । तिला पति एकच प्रमाण ॥ न पाहावे त्याचे दोष गुण । आपले कर्तव्य करावे जतन ॥ पतिव्रताधर्म श्रेष्ठ भारी । वंदिताती संत महामुनि ॥ पतिआज्ञा प्रमाण । हेच मुख्य साध्वीचे लक्षण जाण ॥ न बोलावे उणेपुरे । जे परमात्म्यास न आवडेल खरे ॥ संतति व संपत्ति । भगवत्कृपेने ज्याची प्राप्ति । त्याचे करावे रक्षण । पण न गुंतू द्यावे मन ॥ जे आवडेल पतीला पाही । तो तो आपला धर्मच राही ॥ मनाने करावे भगवंताचे स्मरण । जेणे चुकेल जन्ममरण ॥ अखंड राखावे समाधान । चुको न द्यावे अनुसंधान ॥ काया गुंतवावी प्रपंचात । मन असावे रघुनाथात ॥ प्रपंचात राखावी खबरदारी । मन लावावे रामावरी । त्याचा राम होईल दाता । न करावी कशाची चिंता ॥ मुखी असावे नामस्मरण । हृदयात भगवंताच्या अस्तित्वाची जाणीव । शुद्ध राखावे आचरण । पवित्रतम



अंतःकरण । मुखाने भगवंताचे स्मरण । त्यावर कृपा करील रघुनंदन । हा ठेवावा विश्वास ।

अनुभव येईल नक्की खास ॥ पतीस करावे एकदा तरी नमन । रामरूप जाणून ॥ त्याचे जाणावे मनोगत । तैसे वर्तणे हे आपले हित ॥ ऐसा नेम ज्याचे घरी । राम उभा त्याचे दारी ॥ आल्या अतिथा अन्न द्यावे । कोणास विन्मुख न पाठवावे । राम कर्ता हा ठेवा भाव । कमीपणाला नाही ठाव ॥ सर्वांचे उगमस्थान एक । हे धरावे चित्ती । त्याला नाही कशाची भीति । रामाविण न पाहावे जग । समाधानाची खूण हीच सत्य ॥ जे जे काही यावे । ते ते रामापासून आले । हा ठेवावा भाव ॥ साक्षित्वाने देहाचा प्रपंच पाहावा । अंतरी रघुनाथ भजावा ॥ देहाची गति प्रारब्धाचे हाती । ऐसे शास्त्रे सांगती । परि न येई हे चित्तीं । एकच जगती माझा रघुपति । मुखानें घ्यावे रामनाम । हृदयीं परमात्म्याचें प्रेम । याहून दुजा न करावा विचार । हा ठेवावा निर्धार । चातुर्मासांत करावी सुरुवात । अखंड चालवावा हा हेत ॥ थोडा नेम सांगतो कांही । तो करूनिया पाही ॥ घ्यावें भगवंताचें नाम । खात, पीत, करीत असता काम । होईल तेवढे करावें जतन । परमात्मा पुरे करील हे जाणावे ॥ सर्वांस सांगावे आशीर्वाद । सर्वांनी जोडावा भगवंत ॥ **आजचे बोधवचन आहे - १८२. मागणे तुम्हा एकच पाही । नामावाचून दूर कधी न राही**

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

**भगवंत आपलासा करून घेण्याचा प्रयत्न करावा. अभिमान सोडून जर असा प्रयत्न चालू ठेवला तर सद्गुरूकृपा झाल्याशिवाय राहात नाही. अंधारात प्रकाशा सोबत चालताना जसे अंधाराचे अजीबात भय नसते तसे गुरुनी सांगितलेल्या अनुसंधानात राहिल्यास दुःखाचे भय वाटतच नसते. सद्गुरु सांगेल तसे वागावे. त्यामुळे आपला अभिमान नाहीसा होतो. क्रमशः**

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**अजरामरवत् प्राज्ञो विद्यामर्थं च साधयेत् । गृहीत व केशेषु मृत्युना धर्ममाचरेत् ॥ सरलार्थ - दाहाण्या माणसाने आपण अजरामर आहो, अशा भावनेने विद्या आ धन मिळवीत रहावे. (मात्र ) मृत्यूने आपले केस धरले आहेत, या भावनेने धर्माचरण करावे - स्पष्टीकरण : माणसाने आयुष्याच्या अखेरीपर्यंत विद्या आणि धन मिळवीत राहावे कारण ती विद्या आपल्या बुद्धीचा विकास करते आणि ते धन सत्कृत्यांसाठी उपयोग पडते. धर्माचे म्हणजे दानादी पुण्यकृत्यांचे आचरण मात्र तातडीने करावे. कारण मृ आपल्यावर केव्हा घाला घालील याचा नेम नसतो.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, ४ जुलै २०२३




ज्ञानाचा दीपस्तंभ : प्रा.सुरेश पुरी सर

पान ५



महाराष्ट्रात काकाच्या विरोधात पुतण्याचे बंड!

पान ८

# पुरोगामी महाराष्ट्राच्या राजकारणाचा चिखल झाला हो..!

## महाभूकंप नव्हे सत्तेचा राजरंगः आधुनिक केसरी जनचर्चेत मान्यवरांच्या प्रतिक्रिया

आधुनिक केसरी

**छत्रपती संभाजीनगर : काल रविवारी( दि. 2 जुलै ) दुपारी अचानक महाभूकंप होऊन सत्तेचा वेगळाच रंगलेला खेळ बघून महाराष्ट्रातील जनतेच्या मनात अनेक प्रश्न उभा राहिले. देशाच्या राजकारणाला महाराष्ट्राने नेहमीच आश्वासक आणि विचारशील दिशा दिली त्या पुरोगामी महाराष्ट्रात अलीकडे राजकारणाचा झालेला चिखल सामान्य जनतेच्या मनात रुतून बसत चालला आहे. आणि यापुढे सिंहासनासाठी आणखी काय काय घडेल? याचा नेम नाही. महाराष्ट्रातील जनतेच्या मनात रुतून बसलेली ही बाब पुन्हा पुन्हा ऐरणीवर येते आहे. पक्षनिष्ठा खुंटीला टांगून केवळ सत्तेसाठी चाललेला आटापिटा महाराष्ट्राचे प्रचंड नुकसान करणारा आहे. याच विषयी संतप्त प्रतिक्रिया आधुनिक केसरी जनचर्चेत विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मांडल्या...**

आधुनिक केसरी जनचर्चा

### पुन्हा पावसात भिजणे आले !



जयप्रकाश दगडे
ज्येष्ठ पत्रकार, लातूर

अनायासे पावसाळा सुरु आहे. त्यामुळे काकांच्या नशिबी या वयात पुन्हा पावसात भिजणे आले आहे . काल सातारा सभेत त्यांनी परत एकवार महाराष्ट्र पिंजून काढण्याची घोषणा केलीच आहे. तथापि, महाराष्ट्राच्या राजकारणात कालच्या रविवारी झालेला महाभूकंप अचानक व अकल्पित होता, असे म्हणणे हा भाबडेपणा ठरेल. राजकीय वर्तुळात अशी चर्चा आहे , की महाराष्ट्रात एकनाथ शिंदेंचा चेहरा विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत भाजपाला अपेक्षित जागा जिंकून देऊ शकत नाही, असा म्हणे गुप्तचर विभागाचा गोपनीय अहवाल दिल्लीश्वरांच्या टेबलावर असल्याने भाजप धास्तावून गेला होता. कारण महाराष्ट्र गमावणे आपल्याला परवडणारे नाही, हे मोदींच्या लक्षात आलेले दिसते. उत्तर प्रदेश खालोखाल लोकसभेच्या महाराष्ट्रात जास्त म्हणजे 48 जागा आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस फोडून अजित पवारांना मंत्रिमंडळात घेण्याचा डावपेच टाकण्यात आला, असे सामान्य जनतेचे म्हणणे आहे. गुप्तचरांचा अहवाल मिळताच मोदींनी मग ' राष्ट्रवादी कॉंग्रेसने सत्तर हजार कोटींचा भ्रष्टाचार केला ' असे जाहीरपणे सांगत पवारांवर जाळे फेकले. अपेक्षित परिणाम झाला. रविवारी दादा आपल्या 9 आमदारांसह मंत्रिमंडळात सहभागी झाले. आता पुढचे काही दिवस राजकीय दुढ्ढाचार्य चर्वितचर्वण करीत बसतील, ही देवेंद्र फडणवीसांची खेळी, की दादांचे राजकीय चातुर्य ? ( दादांचीही कमालच म्हणायची. कॉन्ग्रेसचा मुख्यमंत्री असला, तरी उपमुख्यमंत्री दादा ! शिवसेनेचा असू द्या, उपमुख्यमंत्री दादा ! एकनाथराव असू द्या, उपमुख्यमंत्री दादाच ! )
बरे, हा सगळा खेळ खेळताना मतदार यांच्या खिजगणतीतही नसतो. तो बिचारा म्हणत बसतो--

***सत्ता कुणा मिळाली मॅण्डेट काय होते, आधीच कापलेले खुर्चीस पाय होते पडदानशीन सत्ता भट्टीत खाक झाली ती राख फासलेले ,कसले उपाय होते केला जरी नमस्ते जोडून हात त्यांनी, तो राम राम नव्हता ते ' बाय् बाय् ' होते***
***घालून एक डोळा डेमॉक्रसीस आमच्या, कुणी दात वेंगाडताना अम्हां हाय हाय केले तो देखणाच होता कलगीतुरा मतांचा***
***कल्लोळ गोंधळाचे ते हाय फाय होते खेळ्या खुशाल खेळा बारामती- देहलीत सत्यात खोचलेले ते छान ' लाय 'होते !***

-- ते काहीही असू द्या, दिल्लीश्वरांना महाराष्ट्राचे राजकीय मैदान मऊसूद करण्याचाच हा डाव ! महाराष्ट्राच्या राजकारणातील दोन घटनांचे साधर्म्य पाहण्यासारखे आहे. काकांनी वसंतदादांच्या पाठीत खंजीर खुपसून पुलोद स्थापन करीत मुख्यमंत्रीपद बळकावल्याची घटना आठवते ? त्यानंतर पत्रकारांशी बोलताना ते 'आमचे नेते यशवंतरावच ' असे म्हणाले होते. हिस्टरी रिपीट्स इटसेल्फ ! आता पुतण्या बंड करून उपमुख्यमंत्री झाला . पवारांच्या निकटचे विश्वासू प्रफुल्ल पटेल तेथे उपस्थित होते. त्यांनी नंतर वाहिन्यांना बाईट देताना 'आमचे नेते शरद पवारच' अशी गर्जना केली !! जनतेला हे सगळे मिळून खुळ्यात काढतायत की काय ? ही गुगली काकांचीच , असा काहींचा संशय आहे. कारण काल पत्रकाराच्या प्रश्नांना सामोरे जाताना काकांच्या चेहर्यावर काहीवेळा हसूही दिसले. शिवाय, प्रफुल्ल पटेल, वळसे- पाटील, हसन मुश्रीफ, छगन भुजबळ, सुनील तटकरे वगैरे काकांच्या नाकातले बाल असणारे नेते दादांच्या खेम्यात कसे काय जाऊन बसले ? आता तर , काल भुजबळ पत्रकार परिषदेत ' शरद पवार आमचे गुरु असून, त्यांना दादांच्या उपमुख्यमंत्रीपदाच्या माध्यमातून आम्ही 'गुरुदक्षिणा ' दिली आहे ' असे म्हणाले. तर, गेलेल्या लोकांची 5 जुलै पर्यंत घरवापसी होईल, असा इशारेवजा दावा सुप्रिया ताईंनी केलाय्. कालच्या सोमवारी त्यास अनुसरून ' राजे ' स्वगृही परतलेसुद्धा ! परतलेला पहिला मोहरा असा त्यांचा उल्लेख आव्हाडांनी केलाय्!! राजकारण्यांनो, कुठं घेऊन चाललाहात शाहू- फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्राला ?

### रोम जळत होतं, तेव्हा निरो फिडल वाजवत होता...



केवल जीवनतारे,
ज्येष्ठ पत्रकार

रोमन सम्राट निरो बाबतची ही म्हण अतिशय प्रसिद्ध आहे. हेच चित्र आपल्या राज्यात, देशात मागील 9 वर्षापासून दिसत आहे. मणिपूर मागील 50 दिवसापासून जातीच्या वणव्यात पेटत आहे, मात्र पंतप्रधान विदेशात योग दिन साजरा करीत आहेत. सारे राजकारणी आपले उखळ पांढरे करण्यात व्यस्त आहेत. 27 जून रोजी प्रधानमंत्री मध्य प्रदेश येथे एका रॅलीत राष्ट्रवादी पक्षाचे नावं घेऊन 70 हजार कोटीचा घोटाळा केल्याचे सांगतात आणि महाराष्ट्रात त्याच राष्ट्रवादीच्या नेत्यांना मंत्रिमंडळात उपुख्यमंत्रीपदाची शपथ देतात.
कालची घटना, समृद्धी महामार्गावर बस अपघातात 25 जणांचा मृत्यू झाला. अक्षरशः मानवी देह होरपळून निघाले , जळून खाक झाले. इवल्याश्या लेकीला कवटाळलेला मृतदेह आग विझल्यावर दिसला, बघणाऱ्यांचे काळीज हेलावून गेले. मन सुन्न झालं, डोळे डबडबले, मात्र दुसऱ्या दिवशी राज्यात राजकारणाच्या सारीपाटावर राजकारण्यांचा सत्तेचा खेळ सुरू होता. बस जळत होती आणि हे आदल्या रात्री दुसऱ्या दिवशीच्या शपथविधीचा सोहळा साजरा करण्याची आखणी करत होते. यावरून राजकारण किती रसातळाला गेले आहे, याची प्रचिती येते. २५ जणांच्या मृत्यूचे जराही दुःख मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह इतर राजकारण्यांच्या चेहऱ्यावर दिसले नाही. राजकारण्यांची संवेदनशीलता संपली आहे. तत्वाचे राजकारण आता होणे नाही.

### विश्वासघातकी राजकारण्यांना जनतेने धडा शिकवायलाच हवा



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

मी दिवसभर बाहेर असल्याने घरी रात्री आल्यानंतर टी.व्ही.वरील राजकारणातील भूकंपाच्या बातम्या ऐकून जोरदार धक्का बसला. राजकारणातील माणसे स्वार्थासाठी किती खालच्या थराला जातात आणि नीतीहीन बनतात हे यावरुन लक्षात आले. सध्या राजकारणात जनतेच्या प्रश्नाविषयी कोणालाही काहीही देणेघेणे नाही. केवळ सत्ता हस्तगत करणे आणि त्यातून मलिदा खाणे हीच प्रवृत्ती बोळाकाली आहे. राजकारण्यांना म्हणजे जनतेने ज्यांना निवडून दिले आहे त्यांचा जनतेशी काहीही संबंध नाही. जनतेच्या समस्या, प्रश्नाविषयी त्यांना म्हणजे आमदारांना काही देणे घेणे नाही. आज हा देश, महाराष्ट्र ज्यांनी ज्यांनी घडवला, बलिदान दिले त्यांच्या विचारांशी बेइमानी करणारेच नेतृत्वं निपजतांना दिसत आहे. त्यांच्यामुळे समाजात वाईट विचारांचं नेतृत्व पुढे जाताना दिसत आहे. म्हणूनच समाजात खुन , मारामाऱ्या,दरोडे, बलात्कार रोजच होताना दिसत आहेत. त्यांच्यावर सरकारचा धाक नाही. म्हणून सामान्य जनता भावगीत झाली आहे. खरे तर जनतेने, तरुणांनी आता जागृत होणं फार गरजेचे आहे. आपल्या समस्या विषयी, बेरोजगाराविषयी, खाजगीकरणाविषयी, नोकरी विषयी हे सरकार, आमदार काहीच करताना दिसत नाहीत. शेतकरी मरत आहे, तरुणही हाताला काम नसल्यामुळे संपत आहे. हे सरकार मात्र सत्तेवर येण्यासाठी काहीही करायला तयार आहे. जनतेला मात्र वाऱ्यावर सोडते आहे. हे लक्षात घेऊनच येणाऱ्या काळात अशा विश्वासघातकी राजकारणांना त्यांची जागा दाखवून द्यायला हवी. अशा विश्वासघातकी माणसांचा परिणाम समाजावर, तरुणावर वाईट होताना दिसतो आहे. समाजात अंदाधुंदी माजते त्यामुळे जनतेने मात्र याविरुद्ध आवाज उठवायला हवा तरच जनतेचे कल्याण आहे.

### महाराष्ट्राला मान खाली घालण्याची वेळ आली....



- संभाजीराजे जाधव
अध्यक्ष अखिल भारतीय लोक कलावंत परिषद

सध्याच्या राजकीय परिस्थिती वरती बोलत असताना मनाला वाईट वाटते. आज सकाळी कोण कुणा बरोबर आहे हे समजायचे बंद झाले. कार्यकर्त्यांनी वार्डातून फिरून निवडून आणायचे आणि यांनी वरती गेल्यानंतर सोयीचे राजकारण करायचे हे अतिशय वाईट कृत्य आहे. राज्याच्या राजकीय परिस्थिती वरती बाहेरच्या राज्यातील राज्यकर्ते हे महाराष्ट्राकडे गलिच्छ राजकारण आहे अशा प्रकारे पाहत आहेत. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण, स्वर्गीय वसंतदादा पाटील, स्वर्गीय बाळासाहेब देसाई, स्वर्गीय वसंतराव नाईक साहेब, स्वर्गीय लोकनेते राजारामबापू पाटील, स्वातंत्र्य सेनानी बाळासाहेब भारदे, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले, शाहू महाराज, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा महाराष्ट्र आज बघायलाच मिळत नाही. क्रांतीकारांचा, शूरविरांच्या महाराष्ट्रावर आज भारत देशामध्ये महाराष्ट्राला मान खाली घालण्याची वेळ आलेली आहे. अशा राजकारणांना परत एकदा निवडणुकीला उभा राहिल्यानंतर कोणीही मतदान करू नये. राज्याच्या सांस्कृतिक आलेखाला छेद देणारे हे राजकारण आहे. त्यामुळे सांप्रदायिक परिस्थिती बिघडून जाते. ज्या राज्याचा सांस्कृतिक आलेख मोठा असेल ते राज्य सुसंस्कृत असते असं मला वाटते. कोणत्या पक्षाला दोष देण्यापेक्षा निवडून आलेले आमदार यांनीच आपल्या पक्षाची एकनिष्ठ राहणं गरजेचं आहे. आपण स्वच्छ पारदर्शक कारभार करत असाल तर कुणालाही घेण्याची गरज नाही. इथून पुढच्या राज्यकर्त्यांनी कमीत कमी आत्ताचा इतिहास डोळ्यासमोर ठेवून स्वच्छ पारदर्शक कारभार केला तर कोणालाही देण्याची गरज नाही. पोटाला लागतंय इतपत मिळवलं गरजेचं आहे. भरमसाठ पैसा मिळवला, ज्याच्या हातामध्ये सत्ता आहे तो त्याचा डाव साधल्याशिवाय



### खंजीर

**काय राजकारण,**
**काय सत्ता**
**बनलाय गुत्ता**
**दुर्जनांचा**

**काय माणसं,**
**काय निष्ठा**
**धुळीस गेली आता**
**नीतिमत्ता**

**काय पक्ष, काय नेता**
**गाढवा पुढं,**
**वाचली गीता**
**काय बंड,**
**काय फूस**

**घरातच धुसफूस**
**होतीया आता**

**काय भक्ती,**
**सगळी नाचक्की**
**खंजीर शोधतोय**
**आपलीच पाठ आता**



सिद्धेश्वर पवार
संपर्क क्र. 9422880080

### 'तत्व ' नावाचा शब्द टांगला खुंटीला...



अमर चव्हाण
सामाजिक कार्यकर्ते

काल घडलेला सत्तेचा राजरंग बघून महाराष्ट्रातील जनतेच्या मनात लोकशाहीच्या भविष्याविषयी न सुटणारे कोडे निर्माण झाले आहे. महाराष्ट्रात चार वर्षांत चार शपथविधी होतात ही लोकशाहीच्या मूल्यांची घसरण होणारी महत्त्वपूर्ण बाब आहे. मग आता निवडणुका घेण्याची गरजच काय ? या सा-यांनी त्यांच्या त्यांच्यात ठरवून टाकल्याची वेळ पुढील काळात आपणास बघावी लागेल. सगळ्याच पक्षात ही गंभीर समस्या खोलवर रुजू पाहत आहे. निष्ठा खुंटीला टांगून जनतेच्या डोळ्यात भरदिवसा मिरची घालणा-या या प्रवृत्ती थांबता थांबणार नाहीत. हे सारे प्रसंग म्हणजे लोकशाहीचे तत्व पायदळी आणि लोकशाही ओशाळून गेली असेच म्हणावे लागेल. मग प्रामाणिक कार्यकर्ते यापुढे सतरंज्या उचलण्याऐवजी 'यांना' सतरंज्यात गुंडालयाशिवाय राहणार नाहीत.

# दिल्लीत खळबळ

आधुनिक केसरी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे दिल्लीतील निवासस्थान असलेल्या परिसरात सोमवारी सकाळी मोठी खळबळ माजली होती. कारण पंतप्रधानांच्या बंगल्यावरून ड्रोन उडत असल्याचे सुरक्षा यंत्रणेच्या निदर्शनास आले होते. एसपीजीने या ड्रोनची माहिती दिल्ली पोलिसांना दिल्यानंतर दिल्ली पोलीस दलातील अनेक वरिष्ठ अधिकारी पंतप्रधानांच्या निवास्थानी दाखल झाले. सकाळी साधारण ५ वाजता एसपीजीने नवी दिल्ली पोलिसांना यासबंधीची माहिती दिली होती. माहिती मिळताच दिल्ली पोलिसांनी तपास सुरू केला. परंतु अद्याप कोणतेही ड्रोन पकडण्यात पोलिसांना यश आलेले नाही. हे ड्रोन नेमके कोणाचे होतं याबाबत पोलीस तपास करत आहेत. तसेच ते ड्रोन पंतप्रधानांच्या निवास्थानापर्यंत कसे पोहचले हा प्रश्नही अद्याप अनुत्तरित आहे. मुळात पंतप्रधानांचे निवास्थान असलेला परिसर नो फ्लाईंग झोनमध्ये येतो. तरीदेखील या परिसरात ड्रोन फिरताना दिसल्याने सुरक्षा यंत्रणेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. दिल्ली पोलिसांनी सांगितले की, एनडीडी नियंत्रण कक्षाला माहिती मिळाली होती की, पंतप्रधानांच्या निवासस्थानाजवळ एक उडणारी वस्तू दिसली आहे. त्यानंतर आसपासच्या परिसरात शोध घेण्यात आला, परंतु अशी कोणतीही वस्तू सापडली नाही. त्यानंतर आम्ही एअर ट्रॅफिक कंट्रोल रूमशी (एटीसी) संपर्क साधला. त्यांनाही पंतप्रधानांच्या निवासस्थानाजवळ अशी कोणतीही उडणारी वस्तू सापडली नाही. पंतप्रधानांचे निवासस्थान ७, लोक कल्याण मार्गावर आहे. या रस्त्याचे आधीचे नाव ७, रेस कोर्स रोड असे होते. तर पंतप्रधानांच्या बंगल्याचे अधिकृत नाव पंचवटी असे आहे. पंतप्रधानांच्या निवसस्थानाबाहेर कडेकोड सुरक्षा व्यवस्था असते. ही सुरक्षा व्यवस्था इतकी चोख असते की, अगदी पंतप्रधानांच्या कुटुंबातील एखादी व्यक्ती जरी पंतप्रधानांना भेटायला जात असेल तरी त्या व्यक्तिला अनेक सुरक्षा टप्पे पार करून जावे लागते. तसेच दररोज पंतप्रधानांना भेटणाऱ्या लोकांची एक यादी त्यांचे सचिव तयार करतात. या यादीत ज्या व्यक्तीचे नाव असेल केवळ तीच व्यक्ती पंतप्रधानांना भेटू शकते. तसेच पंतप्रधानांना भेटायला जाणाऱ्या व्यक्तिंकडे ओळखपत्र असणे आवश्यक असते.

# प्लास्टिक वापराने पर्यावरणाच्या गंभीर समस्या



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**सिंथेटिक फायबरप्रमाणे, प्लास्टिक देखील एक पॉलिमर आहे. जेव्हा रासायनिक पदार्थांची लहान लहान एकके एकत्र होऊन एक मोठे युनिट बनते तेव्हा त्याला पॉलिमर म्हणतात.हे पॉलिमर देखील नैसर्गिक असतात, जसे की कापूस, रेशीम इत्यादी आणि ते कृत्रिम देखील आहेत, जसे की सिंथेटिक फायबर (तंतू) म्हणजे नायलॉन, पॉलिस्टर, रेयॉन, ऍक्रेलिक इ.निसर्गाच्या आधारावर प्लास्टिकचे दोन प्रकार आहेत - थर्मोप्लास्टिक आणि थर्मोसेटिंग प्लास्टिक. थर्मोप्लास्टिक्स गरम झाल्यावर त्यांचा आकार सहज बदलतात, थर्मोसेटिंग प्लास्टिक गरम झाल्यानंतरही त्यांचा आकार बदलत नाही. पॉलिथिन आणि पीव्हीसी ही थर्मोप्लास्टिकची उदाहरणे आहेत, ज्याचा वापर खेळणी आणि विविध प्रकारचे कंटेनर (डबे) बनवण्यासाठी केला जातो.**

बेकेलाइट आणि मेलामाइन ही थर्मोसेटिंग प्लास्टिकची उदाहरणे आहेत, ज्याचा वापर इलेक्ट्रिकल वस्तू बनवण्यासाठी केला जातो. प्लॅस्टिक पाणी आणि हवेवर प्रतिक्रिया देत नसल्यामुळे आणि वजनाने हलके, मजबूत, टिकाऊ आणि धातूपेक्षा स्वस्त असल्याने, ते उद्योगात आणि घरगुती वस्तू बनवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वापरले जाते.

प्लॅस्टिकचे अनेक महत्त्वाचे उपयोग असले, तरी एकेरी वापराच्या प्लास्टिकवर आपले अवलंबित्व वाढत चालले आहे. त्यामुळे पर्यावरणाच्या गंभीर समस्या निर्माण होत आहेत.या प्लास्टिकची विल्हेवाट लावणे ही मोठी समस्या आहे. विशेष म्हणजे, जिवाणू इत्यादींच्या क्रियांमुळे जे पदार्थ विघटित होतात, त्यांना बायोडिग्रेडेबल म्हणजेच विद्रव्य म्हणतात. या क्रियांमुळे जे विघटित होत नाहीत त्यांना 'नॉन-बायोडिग्रेडेबल' म्हणतात, त्यात प्लास्टिक देखील येते.प्लॅस्टिकचे पूर्णपणे विघटन होण्यासाठी 100 ते 500 वर्षे लागतात असे अभ्यासातून दिसून आले आहे. शिवाय, या कृत्रिम पदार्थांची जळण्याची प्रक्रिया खूप मंद असते आणि ती सहजासहजी जळत नाहीत. जळण्याच्या प्रक्रियेत, ते वातावरणात भरपूर प्रमाणात विषारी धूर देखील सोडतात, ज्यामुळे वायू प्रदूषण होते.टाकून दिलेले प्लास्टिक आपल्या नैसर्गिक स्थलीय, स्वच्छ पाणी आणि सागरी अधिवास प्रदूषित करते.

पाण्यातील बॅक्टेरियांची पातळी धोकादायक बनते. किनारी प्रदेशात शहरांचे सांडपाणी व कचरा टाकल्यामुळे पाणी तर दूषित होतेच; पण त्याचबरोबर पाण्यातील प्राणवायू कमी होतो, विषारी द्रव्ये वाढतात. समुद्राच्या तळावर किंवा समुद्राच्या सी-बेडवर प्लास्टिकचा कचरा वाढत आहे. खोल समुद्रात सूर्यप्रकाश पोहचत नसल्याने आणि कमी तापमानामुळे पाण्याखालील जीवजंतू यांच्यासाठी ही चिंतेची बाब आहे. तर हलके वजनाचे प्लॅस्टिक त्यांच्या उच्छृंखल स्वरूपामुळे समुद्राच्या पृष्ठभागावर राहतात आणि सागरी प्रवाहांच्या मदतीने समुद्रात प्लास्टिकचे 'गायरे' तयार करतात. आजकाल मायक्रोप्लास्टिक हा शास्त्रज्ञांसाठीही चिंतेचा विषय बनत चालला आहे. कासव, मासे, समुद्री पक्षी, सस्तन प्राणी आणि अपृष्ठवंशी प्राणी यांद्वारे प्लॅस्टिक कचऱ्याचा वापर अन्न म्हणून करणं ही सागरी प्लास्टिक कचऱ्याची सर्वात चिंताजनक बाब आहे. हे प्लॅस्टिक त्यांच्या शरीरात जाऊन जैव जमा होतात. बायो एक्युमुलेशनचे कारण बनतात.जैवसंचय अंतर्गत, नॉन-फिक्स न करता येणारे प्रदूषक इकोसिस्टमच्या अन्न साखळीतील विविध ट्रॉफिक स्तरांमधून जातात. या प्रदूषकांचे शरीरात चयापचय होऊ शकत नसल्यामुळे, त्यांची शरीरातील एकाग्रता वाढते. या प्लॅस्टिकमधून बाहेर पडणाऱ्या घातक रसायनांमुळे किंवा प्लास्टिक पचनसंस्थेत अडकल्यामुळे हे जीव मरतात.त्यामुळे त्यांची प्रजनन क्षमता कमी होते.

प्लास्टिक प्रदूषणाचा केवळ समुद्रावरच परिणाम होत नाही, तर गोड्या पाण्याचे स्रोत, जमीन, प्राणी आणि मानवांवरही मोठ्या प्रमाणावर परिणाम होतो. मातीत मिसळल्याने, प्लास्टिक खनिजे, पाणी आणि पोषक तत्वांच्या शोषणात अडथळा आणते आणि त्याची सुपीकता कमी करते. लँडफिल्समध्ये टाकण्यात आलेले प्लास्टिक पाण्यावर विक्रिया करून घातक रसायने तयार करतात आणि भूजलाची गुणवत्ता खराब करतात.प्लॅस्टिकमध्ये आढळणारी विषारी रसायने, जसे की स्टायरीन ट्रायमर, बिस्फेनॉल ए आणि पॉली स्टायरीनमध्ये आढळणारे बेंझिन, आपल्या पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता खराब करत आहेत. संयुक्त राष्ट्रच्या म्हणण्यानुसार, जगभरात



दरवर्षी चाळीस लाख टन प्लास्टिक तयार होते, परंतु केवळ दहा टक्के पुनर्वापर केले जाते. एकूण प्लास्टिक उत्पादनापैकी निम्म्याहून अधिक एकल वापर प्लास्टिकचा वाटा आहे. दरवर्षी 1.9 ते 2.3 लाख टन प्लास्टिक कचरा तलाव, नद्या आणि महासागरांमध्ये टाकला जातो. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून गेल्या वर्षी पंतप्रधानांनी लोकांना प्लास्टिक प्रदूषण थांबविण्याचे आवाहन केले होते. तसेच 2022 पर्यंत भारतातून सर्व एकल-वापर प्लास्टिक नष्ट करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र बंदी असतानाही पर्याय नसल्याने त्याचा बिनदिक्कत वापर केला जात आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि घनकचरा व्यवस्थापन कायदा, 2016 नुसार, सुका कचरा म्हणजे प्लॅस्टिक, कागद, धातू, काच आणि ओला म्हणजे स्वयंपाकघर आणि बागेतील कचरा त्यांच्या उगमस्थानी विलग करणे आवश्यक आहे. सुमारे वीस राज्यांनी काही प्रकारच्या प्लास्टिकवर बंदी घातली आहे.आंतरराष्ट्रीय स्तरावरही एकेरी वापराचे प्लास्टिकमुक्त जग निर्माण करण्यासाठी अनेक प्रयत्न केले जात आहेत. वर्षभरापूर्वी, नैरोबी येथील संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण परिषदेत, दोनशेहून अधिक देशांनी महासागरांतील प्लास्टिक प्रदूषण काढून टाकण्याचे आवाहन करणारा ठराव संमत केला.जरी हा कायदेशीर बंधनकारक करार नसला तरी पुढील मार्ग ठरवण्यासाठी तो उपयुक्त ठरेल. हा ठराव यूएनईपी (UNEP) घोषणेचा एक भाग आहे, ज्यामध्ये कचरा कमी करणे, प्रदूषण आणि जीवनशैलीला होणारे नुकसान याविरुद्ध कठोर नियमांची आवश्यकता आहे.काही काळापूर्वी चिली, ओमान, श्रीलंका आणि दक्षिण आफ्रिकेनेही 'क्लीन सीज कॅम्पेन' नावाची मोहीम सुरू केली होती.

प्लॅस्टिकमुळे होणारी हानी रोखण्यासाठी चर्चेत मांडलेली ही सर्व पावले कितपत प्रभावी ठरतात हे पाहावे लागणार आहे. प्लॅस्टिक कचरा तात्काळ कमी करण्यासाठी कचऱ्याची उत्तम विल्हेवाट आणि व्यवस्थापन आवश्यक आहे. कचरा व्यवस्थापनासाठी 'रिड्यूस, रियुज आणि रिसायकल' हे तत्व अंमलात आणण्याची गरज आहे.पुनर्वापर प्रक्रियेत खाजगी क्षेत्रांचा सहभाग वाढविण्यासोबतच स्थानिक पातळीवरही या दिशेने काम करण्याची गरज आहे. प्लास्टिकच्या निर्मितीपासून ते कचऱ्याच्या व्यवस्थापनापर्यंत विविध टप्प्यांवर प्रभावी धोरणे अवलंबणे अत्यंत आवश्यक आहे. 'टेक-मेक-थ्रो' पद्धतीचा त्याग करावा लागल्याने आपल्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग बनलेल्या या सर्वव्यापी साहित्याचा आपण कसा बनवतो आणि वापरतो यावर पुनर्विचार करण्याची नितांत गरज आहे. वैयक्तिक संकल्प करून एकेरी वापराचे प्लास्टिक टाकून दिले जाऊ शकते, अन्यथा मानवी जीवनाला आनंद आणि सुख सोयी देणारे प्लास्टिक या पृथ्वीवरून मानव आणि इतर सजीवांचा कायमचा नाश करेल.

# गुरु पौर्णिमेचे महत्त्व




माधव बैलकवाड
संपर्क 9545013082

आधुनिक केसरी

**गुरुपौर्णिमा म्हणजे गुरूंच्याप्रति लिन होण्याचा आणि गुरुप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. आषाढ महिन्यांत गुरु पौर्णिमा साजरी केली जाते. आषाढ शुद्ध पौर्णिमेला आपण गुरू पौर्णिमा किंवा व्यास पौर्णिमा म्हणतो. या दिवशी गुरुतत्व एक हजार एक हजार पटीने कार्यरत असते त्यासाठी शिष्य यादिवशी अखंड आपल्या गुरुसेवेत मग्न असतो. गुरू शिष्य नाते हे असे एक नाते आहे की ज्याला मर्यादा नाही. अखंड साधनेत कार्यमग्न असणे, गुरूंनी दिलेले नाम घेणे, गुरूंचा महिमा गाणे, प्रसंगी प्राणाचीही पर्वा न करता गुरू कार्य करणे, असं अतूट नातं म्हणजे गुरू शिष्याचं नातं. गुरू शिष्य परंपरा हे आपल्या भारत देशाचं एक वैशिष्ट्य म्हटलं तरी वावगे ठरणार नाही. आपल्या देशात तर गुरुचे महत्व खुप आहे.**

गुरूला साक्षात देव मानणारी आपली संस्कृती आहे. म्हणूनच गुरुर ब्रह्मा। गुरुर विष्णू। गुरुर देवो माहेश्वरा। गुरू साक्षात परब्रह्म। तस्मई श्री गुरू देव नमः अशी आपण गुरूंची ओळख करून देतो. गुरू म्हणजे काय ? गुरूंचे महत्व काय ? आपल्या जीवनात गुरूंचे असणे म्हणजे काय ? या सगळ्या गोष्टींची उत्तरे एका लेखात मिळणे अशक्य आहे यास्तव थोडक्यात सांगायचे म्हणजे आपल्याला देव दाखवता येत नाही, पण गुरूंच्या माध्यमातून आपण देवालाच अनुभवत असतो. देवाने गुरूंच्या माध्यमातून केलेली कृपा अनुभवत असतो. गुरूंची लीला शब्दात मांडणे अशक्य आहे. म्हणून तर आपण दरवर्षी गुरूंविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी गुरुपौर्णिमा साजरा करतो. गुरू हा संतकुळीचा राजा। गुरू हा प्राण विसावा माझा। गुरुविण देवपूजा पाहत नाही त्रैलोकी। वरील काव्य पंक्तीतून गुरू शब्दाची महती येते. कारण गुरूला आपल्या जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. गुरुच आपल्याला अज्ञानातून बाहेर काढतात. प्रथम आपण गुरु या शब्दाचा अर्थ समजून घेऊया. गु म्हणजे अंधकार आणि रु म्हणजे नाहीसे करणारा. गुरू आपल्याला जीवनातील विकारांचे अज्ञान दूर करून आनंदी जीवन कसे जगावे हे शिकवतात आणि प्रकाशाच्या म्हणजेच ज्ञानरुपी योग्य वाटेवर चालण्यास प्रवृत्त करतात. गुरू म्हणजे ज्ञानाचा अखंड झरा आहे. अंधकाराचा नाश करून प्रकाशाचा किरण देणारा गुरू असतो. एकदा का गुरू आपल्या आयुष्यात आले की त्यांची कृपा सतत आपल्यावर होत राहते. गुरूंनी सांगितलेली साधना सतत करणे हीच गुरूंविषयी खरी कृतज्ञता होय. गुरू आपल्यावर निरपेक्ष प्रेम करतात. त्यांना आपला शिष्य आपल्यापेक्षा मोठा झालेला पाहणे एव्हढेच अपेक्षित आहे. त्यासाठी ते आपल्या



आपल्या शिष्यांना उत्तम असे ज्ञान देत असतात. जर उत्तम ज्ञान मिळवून उत्तम व्यक्ती म्हणून समाजात ज्ञान कमवायचे असेल तर जीवनात गुरुंना पर्याय नाही. माणसाच्या जीवनातील पहिले गुरू म्हणजे त्याचे आईवडील.आई ही तर आपल्या जीवनातील प्रथम आद्य गुरू. आई इतकं श्रेष्ठ दैवत या जगात नाही असं समर्थांनी लिहिले आहे. मूल जेंव्हा लहान असते तेंव्हा आईवडीलच त्याच्यावर संस्कार करीत असतात.त्याला छोट्या छोट्या गोष्टीतून जीवनात कसे वागायचे ते शिकवत असतात.आईवडील हेच तर आपले प्रथम गुरू असतात. म्हणून त्यांचा आदर करायला हवा. आईवडीलानंतर नंबर लागतो तो शिक्षकांचा त्यांचीही आपल्या जीवनात खूप महत्वपूर्ण भूमिका असते. मुलांवर योग्य आणि चांगले संस्कार करण्याचे, बाल मनाला पैलू पाडण्याचे काम शिक्षक करीत असतात. मुलांच्या जीवनाला खरा आकार शिक्षकच देत असतात. आईवडील आणि शिक्षकांनी कोऱ्या पाटीवर केलेले संस्कार कायमस्वरूपी टिकून राहतात मग ते चांगले असोत की वाईट. त्याचाच प्रभाव त्या मुलांच्या पुढील आयुष्यात कायम राहतात. आईवडील आणि शिक्षकच नव्हे तर जन्मापासून आपण आपल्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक गोष्टींपासून, व्यक्तींपासून काही ना काही तरी शिकतच असतो. प्रत्येक गोष्ट जी आपल्याला शिकवण देते ती गुरुच असते. उदाहरणार्थ- सूर्य, पृथ्वी, नदी, जल, वारा, अग्नी, झाडे, पाने, फुले, ढग,डोंगर निसर्गातील प्रत्येक गोष्ट आपल्याला काही तरी शिकवत असते. या सर्वांना आपण गुरुस्थानी मानून त्या प्रत्येक पदार्थांविषयी कृतज्ञता बाळगली पाहिजे. त्यांची देण्याची, त्यागाची, परोपकाराची वृत्ती आपण जोपासली पाहिजे. या सर्व गोष्टी जोपासण्यासाठी आपल्याला गुरूंची आवश्यकता असते.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# आर्य चाणक्यचे मूठभर धान्य प्रवाह अनाथालयास समर्पित

## गुरुपौर्णिमेनिमित्त चिमुकल्यांनी जमवलेल्या ६ क्विंटल धान्याचे समर्पण

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** आ नो भद्रः क्रतवोजन्तु विश्वतो..

सर्व दिशांनी ज्ञान येवो त्याचा आम्ही स्वीकार करतो,असे प्रतिपादन करणारी रुद्रसुक्तातील रुचेप्रमाणे आपण जीवनात सर्व गुरूकडून ज्ञान स्वीकारण्याचा आग्रह ठेवतो. आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिरात ज्ञान देणाऱ्या विविध गुरूंना वंदन करण्यासाठी आयोजित कार्यक्रमात ठरल्याप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांनी गुरुप्रती समर्पण भाव व्यक्त करण्यासाठी आपल्या जेवणातील एक धान्य वर्ज्य करून एक दिवसाचे धान्य शाळेत घेऊन आले ते धान्य प्रवाह अनाथालयातील विद्यार्थ्यांना समर्पित केले.याप्रसंगी जवळपास गहु चार क्विंटल , तांदुळ दोन क्विंटल, बाजरी५किलो असे एकूण सहा क्विंटल धान्य जमा झाले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष भास्कर कुलकर्णी, प्रमुख पाहुणे प्रवाह परिवाराचे संस्थापक अध्यक्ष रामेश्वर गोर्डे व मार्गदर्शक वर्षा पाडळकर मंचावर उपस्थित होते. गुरुपौर्णिमे विषयी मार्गदर्शन करताना वर्षा पाडळकर यांनी गुरु महिमा वर्णित करत कथेद्वारे गुरु नामदेव महाराज व विसोबा खेचर यांच्या जीवनातील प्रसंगातून गुरूंचे महत्त्व प्रतिपादन केले. तसेच रामेश्वर गोर्डे यांनी आपल्या अमोघ वाणीतून विद्यार्थी दशेत मुलांनी कसे वागावे ?आपली व्यक्तिमत्त्वाची उंची वाढवण्यासाठी ज्ञान वायू आपल्यात भरून घ्यावा व हेलियम भरलेल्या फुग्याप्रमाणे आकाशात भरारी घ्यावी व आपल्याबरोबरच आपल्या गुरूंचे नाव आपल्या वर्तनातून उंचवावे असे सांगितले. याप्रसंगी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप



करताना मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांनी आपल्या शाळेतील सर्व शिक्षक विद्यार्थी यांना शुभेच्छा देत मार्गदर्शन केले.यावेळी बोलताना सरांनी शिक्षकांसहित विद्यार्थ्यांनीही आपली उंची वाढवण्याची अपेक्षा व्यक्त केली. समारोप करताना सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, शाळेतील सर्व इतर कर्मचारी यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. कार्यक्रमाच्या समारोप पारसंगी शाळेचे संचालक मंडळ उपस्थित राहून आवर्जून सर्व गुरुजन वर्गांचे स्वागत गुलाबपुष्प देऊन केले त्यात शाळेचे अध्यक्ष पद्मकुमार कासलीवाल, कार्यवाह जुगलकिशोर लोहिया, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य विजय चाटूपळे व माध्यमिक शालेय समिती अध्यक्ष नंदकिशोर मालाणी यांनी शिक्षकांना गुलाबपुष्प देऊन शुभेच्छा दिल्या.

# मोटारसायकलच्या धूम स्टायलीत तरुणांचे बळी

## सपोनि भरत मोरे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथे व सोयगाव तालुक्यात सध्या दुचाकी अपघातात तरूणांचे बळी जाण्याच्या घटनात वाढ झाली आहे. काही पालकांच्या बेपर्वाईमुळेच त्यांच्या घरातील विझलेल्या 'दिव्याची 'धग' किमान आपलं घरा पर्यंत येऊ नये, असे वाटत असेल तर पालकांनी १८ वर्षवया खालील मुलांच्या हातात गाडी देऊ नका व जे पाल्य गाडा चालविण्यास पात्र आहेत त्यांना हेल्मेट घातल्या शिवाय घराच्या बाहेर पडू देऊ नका असा संदेश गावोगावी जाऊन पालक वर्गाला महामार्ग पोलिस मदत केंद्र फर्दापूर घाटाचे, कर्तव्यदक्ष पोलिस सहाय्यक पोलीस निरीक्षक भरत मोरे यांनी करून पाल कत्वजोपासून भविष्यातील वाईट घटनांना पायबंद करण्याची विनंती केली आहे.सोयगाव तालुक्यातील हे फर्दापूर हायवेवर असून या रस्त्यावर दिवसाला लाखो वाहने ये जा करतात, त्यातच रात्रीच्या वेळेस अवजड वाहनांची ये जा होते.उन्हाचा पारा ४० वर चडलेला असतांना व सोबत सणावाराच्या नवलाईत तरूण मोठ्या प्रमाणात दुचाकीचा वापर करतात, यात मुख्यत्वे १८ वर्षाखालील मुलांचा भरणा अधिक दिसून येतो. यात तरूणाई अजिंक्य धुमस्टाईल करते ते वेगळे, परंतु रोजच्या रोज दुचाकी अपघातात तरूणाईचे बळी जात असल्याच्या घटना नित्याच्या झाल्याने, यात किती घरातील 'दिवे विझून अंधार झालंय' त्या मायबापाच्या दुखाला पारावारा नाही काबाड कष्ट करून शिकविलेली मुलं एकुलती एक मुल, अपघातात बळी गेलेल्या कुंटूबांची वाताहात होते. आयुष्य भर या दुखातुन सुटका होत नाही. तर या दुखाच्या खाईतुन सुटका व्हावी असं जर खरोखरच प्रत्येक माय बापाला वाटत असेल तर आपल्या १८ वर्षाखालील मुलाला दुचाकी देऊ नका, व वयस्कमुलाला वाहन दिल तर किमान त्याला वेगाचे बंधन घालण्या सोबत हेल्मेटसक्तीच करावं हा संदेश सपोनि भरत मोरे हे आपल्या कर्मचा-या सोबत गावोगावी जाऊन हेल्मेटसक्तीची जनजागृती करतात, दररोज दुचाकी वरून जाणा-या बळीत आपल्या घरचा 'दिवा' विझू नये हि दक्षता बाळगण्याची कळकळीची विनंती पालकांना ते भेटून करतात. पालकांनी दुचाकी मुलांना देताना संभाळून द्या असे आवाहन सपोनि भरत मोरे फर्दापूर पोलिस स्टेशन यांनी केले आहे.

# परमिटवरील बियाण्याची त्वरित उचल करावी : कृषी अधिकाऱ्यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** महाराष्ट्र राज्य सरकारद्वारे चालविली जाणारी सोयाबीन उत्पादकता वाढ व राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत महाडिबीटी पोर्टलवर चालू खरीप हंगाम २०२३ करिता ज्या शेतकऱ्यांनी फॉर्म भरले आहेत. त्यांना धर्माबाद तालुका कृषी अधिकारी कार्यालय मार्फत बियाणे परवाने वाटप केलेले आहेत. अशा शेतकऱ्यांनी त्वरित परमिट वरील बियाण्याची शेतकऱ्यांनी उचल करावी असे आव्हान तालुका कृषी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

नुकतेच तालुक्यात पेरणीपूरक पाऊस झाले आहे.मात्र शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडून परमिट वरील बियाण्यासाठी परवाने घेतले आहेत.पण त्यांनी बियाण्याची उचल केलेले दिसून येत नाही. परिणामी शेतकरी व कृषी विभागाला अनेक अडचणीला सामोरं जाव लागू शकते. एक, कृषी विभागाला मागणीनुसार बियाणे महाबीज नांदेड यांचेकडून उचलून पुरवठा करावे लागतात पण जर बियाणाची उचलच होत नसेल तर गरजेइतके मागणी कशी करता येईल ? दोन, एकाच वेळेस शेतकऱ्यांनी परमिट वरील बियाणासाठी गर्दी केल्यास परवानाधारकांना वेळेत पुरवठा करणे कसे शक्य होईल.तीन,सदर परवण्याची मुदत दिलेली तारखेपासून फक्त तीन दिवसाची आहे. या सर्व धांदळीत भविष्यात उडू शकणाऱ्या शक्यता गृहीत धरून कृषी विभागाने त्वरित बियाणाच्या दुकानावर जाऊन खरेदी करावी असे आव्हान केले केले आहे.



# जयंतीनिमित्त वसंतराव नाईक यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** तालुक्यातील कृषी विभागाच्या वतीने पंचायत समिती सभागृहात साजरी करण्यात आली. यावेळी तालुक्यातील कृषी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या शेतकरी, कर्मचारी, ग्रामपंचायत स्तरावर काम करणारे ग्रामपंचायत ऑपरेटर आदींचा सत्कार यावेळी करण्यात आला. या कार्यक्रमात तालुका कृषी अधिकारी भारत कासार मंडळ कृषी अधिकारी निवृत्ती जोरी, कृषी विस्तार अधिकारी सुदाम शेंगुळे, गणेश पवार, शून्य मशागत तंत्रज्ञान गुलाबराव खंडागळे, जगदीश जाधव, कृषी विभागाचे सर्व कृषी सहाय्यक, पंचायत समितीचे कर्मचारी हजर होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल गोराडे यांनी तर आभार मकरंद ननावरे यांनी मानले.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत एक ठार

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** 1 जुलै 2023 रोजी मोहिदेपूर तालुका जळगाव



जामोद येथे अज्ञात वाहनाच्या धडकेने एक इसम गंभीर जखमी होऊन दिनांक 2 जुलै 2023 रोजी मरण पावले. मिलिंद सुदाम वानखडे असे सदर मरण पावलेल्या इसमाचे नाव असून राहणार आसलगाव तालुका जळगाव जामोद जिल्हा बुलढाणा येथील ते रहिवासी आहेत. दि 1 जुलै रोजी संध्याकाळी सात साडेसातच्या दरम्यान आपल्या मोठ्या भावाचे सासरे यांना वडोदा पानाचे येथे सोडून परत ही येताना पळशी सुपो रस्त्याने मोहिदेपूर गावाजवळ अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार टक्कर दिली व निघून गेले. ज्यामध्ये ते रोडवर पडले व एक दीड तास त्यांची मोटरसायकल व ते तेथेच पडलेले होते सदर इसमाला गावातून व रोडवरून कोणतीही मदत लवकर न मिळाल्याने त्यांच्या डोक्यातून जास्त रक्तस्त्राव झाला. आसलगाव येथीलच काही लोकांना या घटनेची माहिति मिळताच त्यांनी जखमीला जळगाव जामोद येथे हलवले पण डोक्याला जबरदस्त मार लागल्यामुळे जळगाव जामोद सरकारी दवाखान्यातून त्यांना खामगाव येथे रेफर करण्यात आले. खामगाव सरकारी दवाखान्यात सुद्धा त्यांची गंभीर प्रकुर्ती पाहता त्यांना अकोला येथे रेफर करण्यात आले. शासकीय रुग्णालय अकोला येथे भरती असताना दिनांक 2 जुलै रात्री साडेअकरा वाजता डॉक्टरांनी त्यांना मयत म्हणून घोषित केले. मिलिंद सुदाम वानखडे यांचे वडील व लहान भाऊ अगोदरच अपघातानेच वारलेले आहेत. त्यांच्या मागे त्यांची पत्नी एक मुलगा वय 14 वर्ष एक मुलगी वय 12 वर्ष असा परिवार आहे.




महाराष्ट्र Business Katta












# ज्ञानाचा दीपस्तंभ : प्रा.सुरेश पुरी सर



-डॉ. श्याम टरके
सहायक संचालक
(माहिती),विभागीय माहिती
कार्यालय, लातूर

आधुनिक केसरी

**अज्ञान तिमिरान्धस्य ज्ञानाञ्जन शलाकया।चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्री गुरवे नमः या संस्कृत श्लोकाचा अर्थ असा, 'अज्ञानाने आंधळ्या झालेल्यांचे डोळे उघडणाऱ्या गुरूंना वंदन'. अनेक अज्ञानरूपी शिष्यांना ज्ञानाची प्रचिती कृतीतून दाखवून दिली ; ती महनीय, आदरणीय व्यक्तीमत्त्व असलेल्या गुरूवर्य सुरेश पुरी (सर) यांनी. आज गुरू पोर्णिमा, त्यानिमित्त त्यांच्या कार्यावरील हा लेख. 'आई मनाचा माणूस', 'जनसंपर्काचे नवे प्रवाह', या ग्रंथांमधून सरांचे महान कार्य समजते. देशभरातील निवडक शिष्यांनी त्यांच्याबद्दल यात लिहिलंय. जन्म, शिक्षण, संघर्ष, आधारवड, धर्मपत्नी विजयमाला यांचं पाठबळ, उत्तम सहकारी, शिक्षक, संघटक, जनसंपर्क तज्ज्ञ आदी माहिती या ग्रंथांमध्ये वाचावयास मिळते. मात्र, अध्यापक पेशाच्या सेवेतून निवृत्त होऊनही तरूणांना लाजवेल, असं कार्य सर आजही करताहेत.**

हिंदी प्रचार सभेचं काम ते नेटानं करतात. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) इथून या वयातही रेल्वेने प्रवास करून ते हैद्राबादला महिन्यातून किमान दोनदा तरी पोहचतात. चार राज्यात प्रचार सभेचं काम करतात. तिथंही सर्वांना सोबत घेऊन पुढे जातात. जनसंपर्काचं चालतं बोलतं विद्यापीठ म्हणून त्यांची महाराष्ट्रात ओळख आहे. 'हिंदी प्रचार सभे'लाही त्याचा प्रत्यय येतोय. प्रधानमंत्री, परीक्षा मंत्री म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळलीय. हिंदीच्या सेवेबद्दल त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेय. सध्याही ते परीक्षा मंत्री म्हणून जबाबदारी सांभाळताहेत. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणा या चार राज्यात हिंदी प्रचार सभेला नवीन दिशा देण्याचं काम सर करताहेत. यातून एवढेच लक्षात येते, की आपल्या राज्यातच नव्हे, तर इतर राज्यात देखील सरांच्या शिष्यांमध्ये दिवसेंदिवस वाढ होतच आहे.

प्राध्यापकीनंतर सेवानिवृत्त होऊन आरामाचं जीवन व्यतित करणं; सरांना सहज शक्य होतं. परंतु त्यांनी तसं केलं नाही. स्वतःला सतत कामात व्यस्त ठेवलं. राष्ट्रभाषेच्या प्रचार, प्रसाराच्या कार्यात वाहून घेतलं. त्यांचा हाही गुण मनाला भावतो. सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक ते करतातच. वाढदिवस, लग्न आदी शुभेच्छाही न चुकता देतात. सुख-दुःखात सहभागी होतात. मार्गदर्शक म्हणून भूमिका पार पाडतात. लग्नही जुळवतात, प्रत्येक प्रसंगात विद्यार्थ्यांना आधार देतात. कोविड काळात तर प्रत्येक विद्यार्थ्याची, त्याच्या कुटुंबाची फोन करून त्यांनी विचारपूस केली, आधार दिला. असा गुरू लाभणे म्हणजे भाग्यच. विशेष सांगायचे तर या वयातही समाज माध्यमांतून ते प्रत्येकाशी कनेक्ट असतातच.

सर्वांनाच सरांचा आधार आहे. प्रत्येक शिष्याला तो गुरूंच्या जवळ असल्याचं वाटतं, तसच सरांबद्दलही आहे. परंतु गुरू-शिष्य परंपरेत गुरू श्रेष्ठ असतो. मात्र, सरांच्या गुरू-शिष्य परंपरेत प्रत्येकजण समान पातळीवर असल्याचं दिसतं, अन् जाणवतही. तसच एवढा सारा जनसंपर्क असतानाही त्याचा कधी बडेजावपणा करताना सर दिसत नाहीत. हा गुणही ग्रहण करण्यासारखाच आहे. सरांच्या परंपरेत एका समानपातळीवर गुरू-शिष्य आहेत. पण सर त्यांच्या खुबीने हे जाणवूही देत नाहीत, हे विशेष.



**वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू विभूती नारायण राय यांच्या हस्ते हिंदी सेवी सन्मान देवून पुरी सरांना विद्यापीठाने गौरविले.**

जनसंपर्काचं चालतं बोलतं विद्यापीठ, पुरीजम्, आई मनाचा माणूस, मातृह्रदयी अशा अनेक बिरूदावल्यांनी सरांना संबोधलं गेलं. आजही संबोधल्या जातंय. पण या व्यक्तिमत्त्वास केवळ एवढ्याच शब्दात गुंफता येणं अशक्य आहे. समाजाला अभिप्रेत दिशा, सर्वार्थानं पाठिंबा देण्याचं काम सर सातत्याने करतात. देश विकासात मोलाचं कार्य कृतीतून करतात, त्याचा कुठेही गाजावाजा करत नाहीत. समाज, जात, पंथ याही पलिकडे जाऊन अशिक्षित पिढ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे पवित्र कार्य त्यांनी केले.

राष्ट्रभाषा, पत्रकारिता, जनसंपर्क, समाज कार्य आदी विषयांच्या माध्यमातून चांगली पिढी घडविण्याचं कार्य सरांनी केलं. अशा गुरूचा शिष्य असण्याचं भाग्य मला लाभलं, याचा मला अभिमान आहे. शिवाय देशाच्या जडणघडणीत आपल्या गुरूंनी वठवलेली भूमिका दीपस्तंभासारखीच आहे. या सगळ्या कार्यास त्रिवार वंदन करतो. या व्यक्तीमत्त्वास अजून शक्ती देवो, ही निसर्ग देवतेस आजच्या गुरू पोर्णिमेच्या दिवशी प्रार्थना करतो.

# गुरु शिष्यपण हे तो अधम लक्षण



हेमंत टाले
संपर्क क्र. 9975807632

आधुनिक केसरी

**गुरु हे बहुजन समाजावर प्रभुत्व गाजवण्यासाठी उच्चवर्णीयांनी वापरलेलं सर्वश्रेष्ठ हत्यार होय. गुरु शिष्य परंपरेतून बहुजन समाजाचं जितकं शोषण आजपर्यंत झालं तेवढं अन्यत्र कुठल्याही परंपरेने केलं नसेल. गुरु ही फक्त उच्चवर्णयांची मक्तेदारी होती. वैदिक परंपरेनुसार गुरूंचा महिमा अपरंपार आहे. आणि म्हणून रामदास म्हणतात. "गुरु तो सकळाशी ब्राह्मण| जरी तो झाला क्रियाहीन| तरी तयाशीच शरण| अनन्यभावे असावे||" पुढे रामदासाचा शिष्य भीमस्वामी लिहितो "सद्गुरुचा कधी न यावा वीट| जरी झाला भ्रष्ट सर्वतोपरी||" गुरु जरी वेभीचारी असला तरी त्याला कृष्ण रूप मानलं पाहिजे. अशा नवीन नीती मूल्यांची रुजवन वैदीकांनी जनसामान्यांमध्ये केली.**

गुरु पदाला अनन्य साधारण महत्व दिल्यामुळे गुरूला सर्वस्व समर्पित केलं पाहिजे हा विचार अनपढ लोकांमध्येच नव्हे तर शिकल्या सवरलेल्या सुशिक्षित लोकांच्या मेंदूमध्ये पण कोरल्या गेला. त्याचं जिवंत उदाहरण म्हणजे अलीकडेच एका हायकोर्टच्या जज ने आपली बायको गाडी बंगल्यासहित एका कानफुक्या गुरुला समर्पित केल्याची घटना सर्वश्रुत आहे. कृष्णाचं सोंग घेऊन असंख्य मुलींचे लैंगिक शोषण करणारा शुकदास ही वैदिक परंपरेचीचं देन होय. भारतीय संस्कृतीचा विषमता मुलक असणारा हा प्रवाह जनसामान्यांचं आर्थिक, शारीरिक, मानसिक, विशेष म्हणजे किती लैंगिक शोषण करत होता आणि आजही करत आहे हे वरील उदाहरणावरून स्पष्ट होते.

याचं गुरु शिष्य परंपरेचा फायदा घेऊन आसाराम बापू आपल्या पुस्तकामध्ये लिहितो. गुरुने बायको मागतली तरी दिली पाहिजे. असं लिहिण्याची हिम्मत त्याला कुठून आणि कशी आली तर गुरु शिष्य परंपरेतून.त्यांने लिहिलेल्या पुस्तकाला एका विशिष्ट धर्माशी जोडुण ते धार्मिक पुस्तक म्हणून वाचन केल्या गेलं असे अनैतिक कृत्य करणारा आणि ते पुस्तकामध्ये नोंदवणारा व्यक्ती आम्ही भारताचा सगळ्यात मोठा आध्यात्मिक गुरु म्हणून जगाच्या पटलावर नेऊन पोहोचवतो. संस्कृतीचा यापेक्षा निकृष्टपणा दुसरा असू शकतो का ? आज तो जेलमध्ये आहे. आजच्या या विज्ञान युगामध्ये भारतीयांकडे परकीयांचा पाहण्याचा दृष्टिकोन कुठला असेल त्याची कल्पना आपण केली पाहिजे. अशा गुरुने केलेल्या उपद्वापामुळे आणि आपण त्याला दिलेल्या फिजूल महत्त्वा मुळे आपल्या देशाची मान किती उंचावली असेल असा प्रश्न आपल्याला पडायला हवा एरवी धर्माचा उदो उदो करणारे तथाकथित धर्म रक्षक याविषयी कधी बोलताना दिसले का ?

भारतीय संस्कृतीचा दुसरा प्रवाह जो समता मुलक आहे. या प्रवाहातील संत आणि महापुरुषांनी या गुरु शिष्य परंपरेवर मात्र जोरदार कोरडे ओढलेले आहे. जनसामान्यांना फसवणाऱ्या लुबाडणाऱ्या या लुटारू गुरूंना राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ते कुत्र्यापेक्षाही नीच असल्याचे म्हटले आहे. "कई जादुगर होते गुरु| फु फा किया करते सदा|| ठाणे ठुणे बतलायके|दुनिया किया करते फिदा|| पर याद रखना भाईयो| ये गुरु नही गुरगुर है|| कुत्ते तभी कुछ ठीक है| पर ये लुबाडे शूर है||" राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी म्हटल्याप्रमाणे गुरु हाडामासाचा नव्हे अर्थात कुठलीही एक व्यक्ती माणसाचा गुरु नसतो. आपण अनेक व्यक्तीकडून ज्ञान घेत असतो. अनुभव घेत असतो. त्यामुळे अनुभवातून मिळालेल्या ज्ञानाला त्यांनी गुरु म्हटलेलं आहे.

खऱ्या अर्थाने आपणच आपले गुरु असतो. याविषयी संत नामदेवांचे संशोधन पुढील प्रमाणे "तुझा तुझी गुरु| तुझा तुझी शिष्य|| तुझा तुझी उपदेश| घेई नामा||" ज्ञानदेवा विषयी पूर्ण आदर राखून आपल्याला म्हणावंच लागतं की संत नामदेव महाराजांनीच वारकरी संप्रदायाचा खऱ्या अर्थाने पाया रचला.



त्याच नामदेवाला इथल्या वैदिक परंपरेने कच्च मडकं म्हणून हिणवलेलं आहे. अर्थात कितीही उच्च प्रतीची प्रतिभा तुमच्याकडे असेल तरी उच्च वर्णीयांशिवाय कोणीही गुरु पदाला प्राप्त होऊ शकत नाही. कारण "ब्राह्मण वेद मूर्तीमंत| ब्राह्मण तोची भगवंत||" "ब्राह्मण जरी मूडमती तरी तो जगद्वंद्य" रामदासाच्या वरील ओळी नुसार उच्चवर्णीय सोडून कुणालाही गुरुत्वाचा अधिकार नाही. परंतु संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी मात्र याचा जोरदार विरोध केला. आणि "सकळासी येथे आहे अधिकार" अशी जोरदार गर्जना केली. शिष्याला आज्ञेत ठेवून त्याची सेवा करून घेणाऱ्या आणि गुरुत्व गाजवणाऱ्या दांभिकांना तुकोबांनी चांगले झोडपून काढले. "गुरु शिष्यपण हे तो अधम लक्षण" गुरु शिष्य पण हे समाजाला अधोगतीकडे नेणारे आहे असं संत तुकाराम म्हणतात. जर एकच ईश्वर दोघांमध्ये व्यापलेला आहे तर कोणी एक श्रेष्ठ असं का बरं म्हणावं. गाडगे महाराज म्हणायचे "माह्या कोणी गुरु न्हाई अण माह्या कोणी चेला न्हाई" आणि म्हणून गुरु मंत्र देऊन शोषणाच तंत्र वापरणाऱ्या तथाकथित दाभिकांचा आमच्या वारकरी संप्रदायाच्या सगळ्या संतांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आधुनिक कर्मयोगी गाडगेबाबा आणि तमाम महामानवांनी जोरदार विरोध केला. शेवटी कोण्याही एका व्यक्तीला जगातल्या सगळ्या विषयाचं समग्र ज्ञान नसतं हे आपण समजून घेतलं पाहिजे आणि म्हणून दत्तात्रेयांनी अनेक गुरु मानले त्यामध्ये प्राण्यांचाही समावेश होता. शेवटी राष्ट्रसंतांनी गुरु शिष्य परंपरेला छेद देऊन स्वतःची गादी निर्माण केली नाही. आणि अमुक हा माझा शिष्य आहे म्हणून गादीवर बसवले नाही. आणि म्हणून एका काळात ज्ञान व्यक्ती केंद्रित होते. आज ज्ञानाची गंगा ओसंडून वाहत आहे. त्यामुळे गुरु शिष्य परंपरा राहावी असा हा काळ निश्चितच नाही.

# टिपूस

किती कोरडे कोरडे
वरी घोंगावे आभाळ
पोटी धरणी मातेच्या
कसा पेटलाय जाळ

ऊन शिवारात लख्ख
जीव करे लाही लाही
तुझ्या दरबारी 'पाण्या'
दिसं ना रे लोकशाही

खोटे बोलून शासक
जशा डुलविती माना
राज्य एकहाती चाले
तसा हुकुमाचा बाणा

त्याच निष्ठुर गुणाची
तुज जडली रे बाधा
चातकाच्या चोचिसाठी
धाड टिपूस एखादा

-भानुदास धोत्रे
परभणी
7972625086



# शरद पवारांनी भाकरी फिरवली, मात्र अजिदादांनी पिठाचा डब्बाच गायब केला



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**२०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या निकालापासून अस्थिरतेचे ग्रहण लागलेल्या महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात रविवारी आणखी एक भूकंप होताना पाहायला मिळालामहाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा मोठा भूकंप झाला आहे. शिवसेनेनंतर आता राष्ट्रवादीतही मोठी फूट पडली असून अजित पवार यांनी आपल्या विरोधीपक्षनेते पदाचा राजीनामा दिला असून शिंदे भाजप सरकारमध्ये दाखल झाले आहेत.**

त्यांनी नुकतीच उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. त्यांच्यासोबत राष्ट्रवादीच्या ९ आमदारांनी मंत्रीपदाची शपथ घेतली आहे. रविवारी महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा राजकीय खळबळ उडाला. अजित पवार तासाभरात विरोधी पक्षनेते ते उपमुख्यमंत्री झाले. रविवारच्या राजकीय घडामोडी इतक्या झपाट्याने बदलत राहिल्या की कुणालाही त्याचा सुगावा लागला नाही. बैठकीनंतर पवार समर्थक आमदारांसह राजभवनात पोहोचले आणि त्यानंतर त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यांच्याशिवाय राष्ट्रवादीच्या नऊ आमदारांनीही मंत्रीपदाची शपथ घेतली, त्यात धर्मराव आत्राम, सुनील वलसाडे, आदिती तटकरे, हसन मुश्रीफ, छगन भुजबळ, धनी मुंडे, अनिल पाटील, दिलीप वळसे पाटील यांचा समावेश आहे. यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्व मंत्री राजभवनात उपस्थित होते. याशिवाय राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल हेही राजभवनात उपस्थित असून ते शरद पवार यांचे निकटवर्तीय असल्याचे बोलले जात आहे.

काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी युवक काँग्रेसच्या 'युवा मंथन' कार्यक्रमात पक्षातील नेतृत्वबदलाबाबत मोठं वक्तव्य केलं होत. भाकरी फिरवावी लागते ती फिरवली नाही तर ती करपते. त्यामुळे आता भाकरी फिरवायची वेळ आली आहे, असं विधान शरद पवारांनी केलं होत.

शरद पवारांचा बोलण्याचा रोख अजित पवारांकडे होता. अजित पवारांना बाजुला करण्यासाठी राष्ट्रवादीत खटाटोप सुरू होता तसच शरद पवारांनी केले.अजित पवारांना त्यांनी बाजूलाच केले.मात्र आता दादांनी भाकरीचा डब्बाच गायब केला. काही दिवसांपूर्वी अजित पवार हे भाजपसोबत सत्तेत सामील होणार असल्याची चर्चा रंगली होती. तेव्हापासून अजित पवार यांच्याभोवती संशयाचे धुके होते. अलीकडच्या काळात अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नाराज असल्याचे सांगितले जात होते. मात्र,ते इतक्या तडकाफडकी भाजपसोबत जाणार नाहीत, असा राजकीय धुरिणांचा अंदाज होता. मात्र, अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी या सगळ्यांचे अंदाज चुकवत राजभवनात शपथविधी सोहळा घेतला. यानंतर अजित पवार इतक्या अचानकपणे भाजपसोबत का गेले,हा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शिंदे गटाचे १६ आमदार अपात्र ठरण्याची शक्यता असल्याने मुख्यमंत्री शिंदे देखील अपात्र ठरतील.सरकार अल्पमतात येत नसले तरीही पुढील राजकीय अनर्थ टाळण्यासाठी भाजप ने बी प्लॅन तयार केला, असं एकंदरीत या नाट्यमय घडामोडींवरून दिसून येत आहे. असे झाले तर. शिंदे सहा महिने निवडणूक लढू शकणार नाही. या पार्श्व भूमीवर देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री तर अजित पवार उपुख्यमंत्रीपद सांभाळतील.दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे. इडीची पीडा टाळण्यासाठी अजित पवार यांनी व



ज्यांच्यावर कारवाई सुरू आहेत त्यांनी बंडखोरी केली, असाही कयास वर्तविला जात आहे. विशेष म्हणजे राज्य सहकारी बँक घोटाळा प्रकरणात ईडीनं आरोपपत्र दाखल केलंय. या आरोपपत्रात अजित पवार आणि पत्नी सुनेत्रा पवारांची आधी नावे होती. अजित पवारांची भाजशी सलगी वाढताच ही नावे गायब झाली. . अर्थात पुरवणी आरोपपत्र दाखल करुनही अजित पवारांचं नाव येऊ शकतं या भीतीनेअजित पवार यांनी भाजपशी हातमिळवणी केली. त्यासाठीच अजित पवार यांनी बंडखोरी करत सरकारमध्ये सामील झाले.

दरम्यान, सुप्रिया सुळे आणि प्रफुल्ल पटेल यांना पक्षाचे कार्याध्यक्ष केल्यानंतर अजित पवार नाराज असल्याच्या चर्चा होत्या. तर ते कधीही भाजपसोबत जाऊ शकतात असं सांगण्यात येत होतं. अजित पवार यांनी मला पक्षाची जबाबदारी द्या, विरोधीपक्षनेते पदावरून मला मुक्त करा असं राष्ट्रवादीच्या बैठकीत सांगितलं होतं. त्यासाठी अजित पवारांनी १ जुलै पर्यंत अल्टीमेटम दिला होता. पण पक्षाकडून कोणताही निर्णय घेण्यात आला नसल्यामुळे अजित पवार नाराज होते. या सगळ्या घडामोडीनंतर ते आता फडणवीस सरकारमध्ये सामील झाले आहेत.

दरम्यान, पटना येथे झालेल्या विरोधकांच्या बैठकीत शरद पवार यांनी जायला नको होतं अशी इच्छा अजित पवार आणि राष्ट्रवादीच्या काही आमदारांची होती. पण शरद पवार हे या बैठकीला हजर राहिल्यामुळे आमदार नाराज होते असंही सांगण्यात येतंय. अजित पवार यांना राष्ट्रवादीच्या ३० ते ४० आमदारांचा पाठिंबा असून त्यांच्यातील ९ आमदारांनी मंत्रीपदाची शपथ घेतली आहे. त्यामुळे सध्याच्या महाराष्ट्राच्या राजकारणातील ही सर्वांत मोठी अपडेट आहे. तर या शपथविधी सोहळ्याला शरद पवार यांचा पाठिंबा नसल्याची माहिती समोर आली आहे.

# नैसर्गिक काव्यप्रतिभेची अनुभूती - सिझर न झालेल्या कविता



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**सुनील पवार हे मराठी काव्य क्षेत्रात सर्व दूर परिचित असलेले एक नाव आहे. उसवलेल्या आयुष्याचे टाचे सांधताना ह्या त्यांच्या पहिल्या संग्रहानंतर सिझर न झालेल्या कविता या शीर्षकासह कविते सोबत आणि आपल्या विचारधारेसोबत कसलीही तडजोड न करता मनातील भाव व्यक्त करणारा त्यांचा कविता संग्रह वाचनात आला. कविता हा आत्महत्येला पर्याय असतो त्यामुळे जीवनातील कठीण प्रसंगी आपण कविता लिहीत गेलो असे म्हणणाऱ्या सुनील पवार यांच्या कवितेबद्दल वेगळे काय बोलावे? व्यवस्थेने पिचलेला सुशिक्षित बेरोजगार आजच्या काळात पीएचडी करू नये जगण्याचा जो संघर्ष करत आहे.**

त्या संघर्षाचे पडसाद त्याच्या जीवनावर कसे पडले, संसारावर कसे पडले याचे यथार्थ काव्यात्मक वर्णन म्हणजे सिझर न झालेल्या कविता हा संग्रह आहे. एकूण 83 कविता मधून कवींनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

**दमलेल्या मुसाफिराला एक वेळची रोटी दे**
**लाख मोलाचा आनंद प्रत्येकाच्या ओठी दे**

अशी सर्वांच्या साठी प्रार्थना करणारा हा एक मनस्वी कवी आहे हे आपल्याला वेगळे सांगावे लागत नाही. बुद्धम शरणम गच्छामी, सिझर अशा कवितांमधून बुद्ध विचारांची आणि त्या विचारांची जीवनावर पडणारी छाया याची विलक्षण अनुभूती या संग्रहातून आपल्याला मिळते. बुद्ध कळला नाही या कवितेतून वर्तमान काळात भौतिक सुखाच्या मागे लागलेली स्त्री, व्यवस्थेने पिचलेला नायक, यांच्या संसारात एकमेकांशी होणारे संघर्ष, नायकाची

होणारी ससेहोलपत, त्यातून मुलांच्या भविष्याकडे पाहून परिस्थिती वर मात करण्यासाठी नायकाचा चाललेला प्रयत्न या सर्व विलक्षण अनुभूतीवर सुनील पवार यांची कविता आजच्या वर्तमानातील दुभंगलेल्या माणसाच्या, आणि दुभंगलेल्या संसाराचे यथार्थ चित्रण उभी करणारी आहे असे म्हणावे लागत. बुद्ध तत्त्वज्ञानाचा जनसामान्य जीवनाशी असलेला इतका सहसंबंध कोणत्याही लेखकाने इतक्या प्रकर्षाने मांडला नसावा. विठ्ठल माझा तथागत या कवितेत विठ्ठलामध्ये तथागत पाहणारा कधी आपल्याला भेटतो . बुद्ध तत्त्वज्ञानासह कवीची निष्ठा आहे ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेवर त्यातून मेंदू धुवावा म्हणतो सारख्या कवितेतून जातीयतेचे सोसावे लागणारे चटके, बा भीमा या कवितेत आंबेडकरी चळवळीची झालेली वाताहत

मांडताना कवी म्हणतात

**लोणी आता ताकातून येणार नाही भीम**
**बाबा जयंती पुरतेच स्मरण तुझे आता भीम बाबा**


जयंती वर्गण्या उत्सव डीजे बँडबाजा हे भीम जयंतीला आलेले स्वरूप कवीला अस्वस्थ करते मात्र त्याच कवितेत बाबासाहेबांशिवाय आकाशातील सूर्य सुद्धा डीम वाटतो ही भावना कवी व्यक्त करत असतात. चळवळ या कवितेत बाबासाहेबांवर लिहिणारे आणि बोलणारे पायलीचे 50 मिळतात मात्र बाबासाहेबांचा विचार अंगीकारणारे किती आहेत ?

असा प्रश्न त्यांना पडतो. बाबासाहेबांसोबत रमाई वर सुंदर कविता या संग्रहामध्ये आढळते. त्याचबरोबर आजच्या व्यवस्थेने लोकशाहीचे असे तीन तेरा वाजवले आहेत ते सांगणारी लोकशाही ही कविता सुद्धा तेवढीच प्रभावी आहे. शाहू फुले आंबेडकर हे बहुजन नायक तथा छत्रपती शिवाजी महाराज हे कवीचे आदर्श असल्याचे हा सगळा वाचताना दिसून येते. त्यांच्यावर यथोचित कविता या संग्रहात आढळतातच. पारिवारिक नातेसंबंधांमध्ये आई वडील पत्नी मुलगी यांच्या संदर्भात काही कविता संग्रहामध्ये वाचायला मिळतात. त्यातही मायबापावरील कविता जास्त लक्षणीय आहेत आपल्या लक्षात येते. संपूर्ण जगाने आपल्याला अर्ध्यावर सोडले तरी आपली लाडकी लेक आपल्याला अर्ध्यावर सोडत नाही सर्वसामान्य बापाच्या मनात असलेला दिलासा कवीने निर्मिती या कवितेमधून व्यक्त केला आहे. नातेसंबंधाचा विचार करत असताना मैत्रीच्या नात्याला कवी प्रचंड महत्व देतात असे दिसून येते.

**तू कुठेही असला तरी दिला मोठा आधार**
**जळताना सरणावर मानू कसे आभार**

अशा शब्दात कवी आपल्या मित्रांचे ऋण अधोरेखित करतात. खरे तर परिस्थितीत दोन्ही प्रकारची माणसे कवीला भेटली. त्यामुळे कवीने माणसाच्या स्वार्थी वृत्तीवर जितक्या प्रभावीपणे लिखाण केले तितक्याच प्रभावीपणे मैत्री जोपासणाऱ्या वृत्तीवर सुद्धा लिखाण केलेले दिसून येते. असेच एक महत्त्वाचे ऋण कवी जोपासत असतात ते म्हणजे शब्दांचे, कवितेचे रूप. आपल्या मनोगतात आत्महत्येला पर्याय कविता या तीन शब्दात कवीने कवितेचे स्वतःच्या जीवनात असलेले महत्त्व अधोरेखित केले आहे.

कविता लिहून आली नाही जखमांवर फुंकर
बळ नाही आणता आली
जगण्याचेमी
कागदाचे
अंग कुठपर्यंत
काळे करायचे
असा स्वतःचाच
स्वतःला प्रश्न
विचारणाऱ्या
कवीने लिहून पोट
भरत नाही याची
जाणीव असली
तरी कविता बरंच
काही सांगते तुमच्या
आमच्या अवतीभवती
ती सारखी रांगते प्रांजळ
भावनेसह कवितेचा
स्वतःच्या जीवनातील
महत्त्व



कवी अधोरेखित करतात. कवितेबद्दल किंवा साहित्य बद्दल लिहिताना त्यांनी साहित्यातील व्यवहार अतिशय स्पष्टपणे उलगडून दाखवले आहेत. दिसत नाही साहित्याचा कोणी येथे पुजारी पुरस्कार मिळवाया जो तो येथे भिकारी अशा शब्दातून पुरस्कारासाठी पुढे पुढे करणाऱ्या साहित्यिकांवर त्यांनी आसूड ओढला आहे तर कधी जात पाहून मिळालेला पुरस्कार नाकारण्याची प्रवृत्ती जाहीरपणे समोर आणली आहे. शब्द, सन्मान अशा कवितेमधून दिवाना खाण्याची शोभा वाढवणारे सन्मानचिन्ह मलनाा दिलासा देत नाही हे सत्य कवी परखडपणे मांडतात. अर्थात अशा वेळी online प्रमाणपत्रासाठी झुरणारे, आणि ते मिळाल्यावर मोठेपणा मिळवणारे महाभाग आठवले की सुनील पवार यांची प्रगल्भता किती जाज्वल्य आहे याची खात्री पटते. परिस्थितीचे चटके, नातेसंबंधाने दिलेले वाईट अनुभव, रोजी रोटी कायमचा उभा प्रश्न, कवितेवरचे निरामय प्रेम ह्या सर्व पार्श्वभूमीवर कधी कधी विनोदाची पेरणी करत, कधी बोली भाषेचा सहारा घेत, कधी नारायण सुर्वे प्रमाणे कामगाराची कविता होणे, तर कधी विठ्ठल वाघाप्रमाणे सखीच्या बिल्लोराशी संवाद साधणारी अलवार कविता सुनील पवार यांच्या लेखणीतून वाचकांना भेटीस आली आहे. परीस पब्लिकेशन यांनी केलेल्या या पुस्तकाला अरविंद शेलार यांचे बोलकी मुखपृष्ठ मिळाले आहेत. ज्येष्ठ परिवर्तनवादी कवी यशवंत मनोहर यांचा मलपृष्ठ लेख सुनील पवार यांची प्रतिभा वनव्यात चांदण्याची लागवड करणारी कविता आहे असे बोलू लागतो तेव्हा सुनील पवारांच्या कवितेचं महत्त्व आपल्याला आपोआप कळतं. ज्येष्ठ समीक्षक श्रीपाल सबनीस यांची प्रस्तावना तथा महाराष्ट्र राज्य मंत्रालयाचे सहसचिव सिद्धार्थ खरात यांचा अभिप्राय

या कवितेची महती अधोरेखित करणारा आहे. असे असले तरी एक मित्र म्हणून सुनील पवार यांच्या क्षमता मला त्यांच्या प्रतिभेशी परिचित असल्यामुळे चांगल्या प्रकारे ठाऊक आहेत त्यामुळे त्यांच्याकडून इथून पुढे यापेक्षा भरीव साहित्य अपेक्षा ठेवायला खूप वाव आहे असे मला वाटत. त्यांची कविता आशय घन असून शब्द श्रीमंत आहे यात शंका नाही मात्र ती परिपूर्ण स्वतंत्र अभिव्यक्ती म्हणून समोर आली पाहिजे असे त्यांना आवर्जून सांगतो. सिझर न झालेल्या कविता म्हणजे कसलीही कृत्रिमता न आणता जशी सुचली तशी लिहिली असा संदर्भ शीर्षक वाचताना येतो. मात्र सिझर करून आलेले लेकर आईच्या आवडीचे नसतात असे उदाहरण कोणी दाखवू शकणार नाही. त्यामुळे कवीने आपल्या कविता कोणत्याही प्रक्रिये शिवाय समोर ठेवल्या आहेत याचा अर्थ न काढता रसिकांनी त्यांचे वाचन केले पाहिजे असे मला वाटते. तसेच सिझर न करता म्हणजे नैसर्गिक या भावनेजवळ शब्दांना थांबवून कवितेवर कसलीही प्रक्रिया न करता ती कविता समोर आणावी असाही अर्थ अभिप्रेत नाही आणि कवीला सुद्धा तसा तो अभिप्रेत नसावा असे मला वाटते. सृजन नैसर्गिक असो की सिझर झालेले मातेला जो त्रास व्हायचा तो होतच असतो, कधी प्रसव कळा सोसवत नाहीत तर कधी सिझरच्या जखमा भरत नाहीत हे येणाऱ्या पिढीने लक्षात ठेवू न कविता लेखन केले पाहिजे ह्या अपेक्षेसह, मित्रवर्य सुनील पवार यांना शुभेच्छा देत त्यांच्या भावी साहित्य लेखनासाठी खूप खूप सदिच्छा.

# गुरुपौर्णिमा उत्सव आणि गुरुमंत्र



ज्योती ज.आळंदकर
९३७०९४६०५७

आधुनिक केसरी

**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णूः गुरुर्देवो महेश्वरः। गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः।। ब्रह्मानंदं परमसुखदं केवलम् ज्ञानमुर्तीम् । द्वंद्वातीतम् गगनसद्दशं तत्वमस्यादिलक्ष्यम्। एकं नित्यं विमलमचलम् सर्वधी साक्षीभूतम्। भावातीतम् त्रिगुणरहितम् सद्गुरुम् तो नमामि।। ।। अवधुत चिंतन श्री गुरुदेव दत्त।। ।।जय जय रघुवीर समर्थ।। आज गुरुपौर्णिमा म्हणजेच व्यास पौर्णिमा,आपल्या हिंदू धर्म संस्कृती मध्ये "गुरु" ला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपल्या जन्मापासूनच आपल्या आयुष्यात गुरुचे स्थान प्रस्थापित झालेले असते.आपली माता ही आपली पहिला गुरु, दुसरा गुरु पिता आणि त्यानंतरचे महत्त्वाचे, आपलं संपूर्ण आयुष्य घडवीणारे,आयुष्याला आकार देणारे असे आपल्याला लाभलेले गुरु म्हणजे आपले "शिक्षकवृंद"हे असतात. हे सर्वांनाच माहीत आहे.पण सर्वसाधारणपणे आपल्याकडे "गुरुमंत्र" घेतल्याशिवाय "मोक्ष" मिळत नाही,मोक्षाची प्राप्ती हवी असेल तर "अध्यात्मिक,पारमार्थिक" गुरु करायला हवा आणि त्यासाठी गुरुमंत्र घ्यायला हवाच असे सांगितले जाते.**

प्रथम आपण "गुरु" ह्या शब्दाचा अर्थ बघुयात. "गु" म्हणजे नरक आणि "रु" म्हणजे त्यातून बाहेर काढणार, मग ह्या नरकयातना ज्या संसारात भोगाव्या लागतात त्या भवसागरातून लिलया तरुन जाण्यासाठी ज्ञानस्वरूप 'गुरु' सानिध्यी जावे लागते. त्यासाठी संतांना "गुरु" करावे. संत सानिध्यात, संत सहवासात त्यांनी नित्य आपल्या मनाला केलेला बोध हा किती श्रेष्ठ आहे हे लक्षात येते.हा नित्य केलेला "बोध" म्हणजेच खऱ्या अर्थाने "गुरुमंत्र" असतो.माझ्या मते "गुरुमंत्र" म्हणजे सकारात्मक विचार करायला प्रवृत्त करणारी "वाणी", सकारात्मक उर्जा मनात जागृत करणारी "शाब्दिक दिव्य शक्ती" होय. कोणाला कळणार नाही,ऐकू जाणार नाही असा ठराविक विधी करुन ठरावीक दिवशी कानामध्ये एखादा "मंत्र" सांगितला जातो त्याला "गुरुमंत्र" असेच आपल्याकडे मानले जाते. जपमाळ घेवून एक, तीन, बारा किंवा कोणी चोवीस माळा त्या मंत्राचा जप नित्य नियमाने करतात. ही जप साधना एक "काम" म्हणून असायला नको,तर आपल्या आयुष्यात आनंदमय, शांतीपूर्ण जीवन जगण्यासाठीची गरज,त्यावरील उपाय म्हणून विश्वासपूर्ण रित्या व्हायला हवी.आपल्याला ह्या सर्व गोष्टींचे मार्गदर्शन संत सानिध्यात मिळते.म्हणून मोक्ष मिळावा ह्या हेतूने किंवा अन्य कोणत्याही प्रापंचिक गोष्टी साध्य करण्यासाठी गुरु करु नये तर अध्यात्मिक,पारमार्थिक उन्नतीसाठी "गुरु" करावयाचा असतो.त्यांच्या चरणी नतमस्तक व्हायचं असतं.



पुर्वापार प्रत्येकजण गुरु करताना दिसतात, गुरुमंत्राचा जप करताना, कोणी गुरुंना मौल्यवान भेटवस्तू देताना दिसतात.गुरुंनी काय उपदेश केला आहे हे लक्षात न घेता बऱ्याच वेळा कांही ठिकाणी शिष्यवर्ग गुरुद्रोह करताना दिसतो. मी श्रेष्ठ शिष्योत्तम आहे तेंव्हा गुरुंनी माझे ऐकले पाहिजे असा अट्टाहास असलेला दिसून येतो.पण

**गुरु शब्द प्रमाण, गुरु आज्ञा जीवन**
**गुरु आज्ञा उल्लंघन, तत्क्षणी ते मरणं ।।**

असे नुसते मानणारे,सांगणारे नव्हे तर आजच्या काळातही स्वतः तसे आचरण करणारे कांही संत विभूती आपल्याला पहायला मिळतात. माझ्या पहाण्यात आलेले त्यापैकीच एक राष्ट्र संत समर्थ रामदास स्वामींचे निस्सीम भक्त "स.भ.श्री मोहन बुवा रामदासी", श्री समर्थ रामदास स्वामी मठ खातगाव येथील मठाधीश.बुवांचा आणि माझा परिचय तसा सोळा वर्षांपूर्वीचा लातूरला "समर्थ पादुका" पूजन दौऱ्यावर आले असताना झालेला.त्यावेळी पूर्ण वेळ फक्त सज्जनगडा साठीच व्यतीत करणारे एक वैराग्ययोगी उपासक ही त्यांची ओळख होती. खातगाव ह्या जन्मगावाहुन इ.स.१९७१ ला वयाच्या दहाव्या वर्षी मोहनबुवा आई,वडील,मोठा भाऊ आणि मोठ्या दोन बहिणीं बरोबर गडावर समर्थांच्या सेवेसाठी रुजू झाले आणि त्यांच्या शालेय शिक्षणा बरोबरच अध्यात्मिक वाटचालही सुरु झाली. गडाचे पायथ्याशी असलेल्या परळी गावातील शाळेत रोज जाणे आणि गडावर वेदाध्ययन, समर्थ वाङमय शिक्षण सुरू झाले. मोहनबुवांनी समर्थ वाङमय फक्त अभ्यासले किंवा आत्मसात केले नाही तर त्यावर चिंतन करून ते तनामनात उतरवले. ह्याचेच फळ की काय म्हणून बुवांना पुढच्या एक वर्षातच इ.स.१९७२ मध्ये वयाच्या अवघ्या अकराव्या वर्षी भगवान श्री प.पू.श्रीधर महाराजांचा गुरुपदेश लाभला. बुवानां " अजापजप" करण्याची आज्ञा झाली आणि त्या क्षणापासून आजतागायत ते अविरत चालू आहे. "अजापजप" म्हणजे काय? हा प्रश्न निश्चित पडला असेल ना? संतांच्या सानिध्यात गेल्यावरच आपल्याला कळतं की अनंत जन्माच्या पुण्य संचयाने हा इतका सुंदर "नरदेह" प्राप्त झाला आहे, तेंव्हा आपल्या मनाला नित्य चांगला बोध केला पाहिजे कारण मिळालेल्या ह्या नरदेहाचा उध्दार करुन घेणे गुरुच्या नव्हे तर आपल्या हातात असते. म्हणून संतांच्या,गुरुच्या सानिध्यात रहावे,गुरु वचन पालन करावे.कारण नरजन्माच्या प्रत्येक एकेका श्वासाची किंमत संत मंडळी जाणून असतात. त्यानांच ती खऱ्या अर्थाने कळालेली असते. म्हणून आपण जेंव्हा संतांच्या सानिध्यात जातो तेंव्हा समजत की नरजन्माच्या श्वासाची किंमत सुवर्णाहून ही अधिक आहे,त्याची तुलना कशाशी ही होवू शकत नाही. आपण आपल्या आयुष्याचा हिशोब आपल्या परिमाणाने लावतो म्हणजे ७० वर्षे, ८० वर्षे, ९०वर्षे पण परमेश्वराचा हिशोब वेगळा असतो. परमेश्वराच्या हिशोबाप्रमाणे आपले आयुष्य श्वासावर अवलंबून आहे. आपला जेंव्हा जन्म होतो त्याच वेळी आपले मनुष्य जन्माचे श्वास ठरलेले असतात. हे निश्चित ठरलेले श्वास संपले की नरदेहाचा मृत्यू निश्चित आहे. आपले दररोज २१,७०० श्वास होत असतात.परंतू एखाद्या दिवशी कशाचा राग आला,चिडचिड झाली तर श्वास २१,७०० पेक्षा जास्त होतात आणि इथे आयुष्य घटते. पण या उलट ज्या दिवशी आपण शांत,प्रसन्न चित्त असतो तेंव्हा आपले श्वास २१,७०० पेक्षा कमी होतात आणि आपले आयुष्य वाढते. ही मेख संतांना माहिती असेल मुळे संत सहसा रागावत नाहीत, चिडत नाहीत. ते कोणत्याही परिस्थितीत शांत राहून प्रत्येक श्वासाबरोबर "नाम जप" करतात. आपल्या २१,७०० श्वासाबरोबर केलेला नामस्मरण जप म्हणजे २१७ माळा इतका जप होतो.हा असा नामस्मरण जप म्हणजे "अजापजप" आणि हा २१७ माळा जप ज्या दिवशी आपला जप होतो तोच जप परमेश्वराचे दरबारात त्याची नोंद होत असते. हा असा अजापजप करण्याची मोहन बुवांना भगवान श्रीधरस्वामींची आज्ञा मिळालेली होती आणि ती गुरु आज्ञा ते आजतागायत नित्य नियमाने पाळत आहेत.



त्यांनी संपूर्ण जीवन फक्त समर्थ सेवेसाठी आणि समर्थ कार्यासाठी, समर्थ प्रचार आणि प्रसार करण्यासाठी वाहीलेले आहे.
प्रत्यक्षात सद्गुरु समोर असतो अथवा नसतो कांही फरक पडत नाही,पडायला ही नको हे आपल्याला त्यांच्या दैनंदिन कृतीतून दिसून येते. इ.स.२०११ मध्ये खातगाव ह्या त्यांच्या जन्मगावी श्री समर्थ रामदास स्वामींचे मुर्तीची स्थापना करुन समर्थ कार्याचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी हा मठ उभारण्यात आला.सज्जनगडावर होणारी दैनंदिन उपासना, पूजा, प्रसाद इत्यादी प्रमाणे खातगाव मठात तेच सर्व तसेच सुरु आहे. अगदी प्रसन्न,अध्यात्मिक ऊर्जेने पुरेपूर भारलेला हा मठ येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला एक अत्युच्च अनुभव, अनुभूती देतो, मग ती व्यक्ती अध्यात्म मार्गावरील असो नसो तो अनुभव वाट्याला येतोच आणि बुवांना तर काय त्यांच्या अखंड उपासनेचे, साधनेचे भरभरून फळ मिळाले आहे. आजही छोटेसे खेडे असलेल्या खातगावच्या ह्या मोहन बुवांना कंबोडिया आणि भारत या दोन्ही देशांतील सनातन धर्म आणि संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी या उदात्त,भव्यदिव्य प्रकल्पाचा भाग असलेले श्री समर्थ रामदास स्वामी मठ खातगाव चे अधिपती आनंदी नारायण कृपा न्यासाचे कार्यकारी विश्वस्त श्रेष्ठ निरुपणकार, अध्यात्मिक क्षेत्रातील अग्रणी धर्मसंस्थांचे संस्थापक, मार्गदर्शक, संत म्हणून "मानद डॉक्टरेट" ही पदवी दिनांक ०६ में २०२३ रोजी लोणावळा येथे भव्य दिव्य सोहळ्यात प्रदान केली गेली.साधारण ४० वर्षे स्वहस्ते श्री समर्थ रामदास स्वामी समाधी सेवा आणि समाधी सानिध्य याचेच हे मधुर फळ त्यांना मिळालेले आहे.
गुरुमंत्र म्हणजे काय ? आणि तो आपल्या मनात कसा रुजतो ते मी आज माझ्या दृष्टीकोनातून सांगणार आहे.एखाद्या संताच्या, थोर विभूतीच्या सानिध्यात असताना आपल्या दुःखी मनावर जी हळुवार फुंकर घातली जाते आणि सकारात्मक विचार करायला प्रवृत्त केले जाते, एक दिव्य ज्योत प्रज्वलित केली जाते ते म्हणजेच "गुरुमंत्र"आहे असं मला अगदी मनापासून वाटतं.दुःखीतांचे दुःख कमी करण्यासाठी मनावर जी शाब्दिक फुंकर घातली जाते तो "गुरुमंत्र" कानात सांगितलेल्या "गुरुमंत्रा" पेक्षा कितीतरी पटीने अधिक प्रभावी असतो. हे मला स्वतःला खातगावच्या मठात अनुभवाला आलेले अनुभव आहे. आनंदी-नारायण कृपा न्यास "श्री समर्थ रामदास स्वामी मठ, खातगाव" या. कर्जत, जि.अहमदनगर ह्या विषयावर आपल्याला सविस्तर असे पुढील लेखात निश्चित वाचायला मिळेल. कारण हा लेख "मठा" वर नसून गुरुपौर्णिमा आणि गुरुमंत्र निमित्ताने लिहिलेला आहे. आपल्या मनात ज्या क्षणी,ज्या दिवशी गुरुवाणी च्या प्रभावामुळे आनंद ओसंडून वाहायला लागले, सकारात्मक उर्जा चे दिप प्रज्वलीत होतील तो दिवस "गुरुपौर्णिमा" च समजावा,असावा आणि अस्वस्थ, दुखऱ्या मनाला स्वस्थ शांत, प्रसन्न वाटेल तो शब्द "गुरुमंत्र" मानावा. तुर्तास इतकेच.

**गुरु थोर की, देव थोर म्हणावा ?**
**नमस्कार आधी कोणा करावा ?**
**मनास माझ्या गुरु थोर वाटे**
**गुरु कृपाप्रसादे आत्मज्ञान भेटे ।।**
**गुरु कटाक्ष गुरु पौर्णिमा ती**
**सानिध्य शितल प्रकाश हाती**
**आत्मिक आनंद जो देई शब्द**
**गुरुमंत्र होवून पालटे तो प्रारब्ध ।।**
**।जय जय रघुवीर समर्थ।।**
**।।अवधुत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।।**

# महाराष्ट्रात काकाच्या विरोधात पुतण्याचे बंड!



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**पुरोगामी महाराष्ट्रात प्रथम शरद पवारांनी बंडखोरीचे बीज पेरले, तेच आता उगवत आहे. त्यांनी भाजपाला सत्तेपासून रोखण्यासाठी मित्र पक्ष शिवसेनेला तोडले. तर शिवसेनेने भाजपाची फारकत घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेसशी सत्तेसाठी संगत केली. महाराष्ट्रात राजकीय चाणक्य, धूरंधर नेते असलेल्या पवारांना पक्ष फुटीचा अंदाज घेता आलेला नाही. पवार हेच राजकारणात गुगली टाकू शकतात, असे नाही. भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीस राजकीय गुगली टाकण्यात तरबेज आहेत. त्यांच्या तर गुगलीने राज्यात ठाकरे यांच्या नंतर शरद पवार यांची विकेट घेतली गेली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पवारांची एकाधिकाशाही व परिवारवादी धोरणा मुळे पक्ष फुटलेला आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार हे पक्षातील बंडानंतर सोमवारी कराड येथे गेले. त्यांनी जाऊन महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते स्व. यशवंतराव चव्हाण यांचे समाधीचे दर्शन घेतले.पवार हे १९५६ मध्ये 'यशवंतरावां'चे हात धरुन राजकारणात आले. ते पवारांचे राजकीय गुरू आहेत. आज पक्ष संकटात सापडल्यानंतर त्यांना गुरु पोर्णिमेनिमित्त आठवण झाली. पण महाराष्ट्रात यशवंतरावांनी विचाराचे, सकारात्मक राजकारण केले. त्यांनी सत्तेसाठी कपटनीती केली नाही. पक्षाशी गद्दारी केली नाही. शेवटच्या श्वासापर्यंत ते काँग्रेस पक्षात राहिले. त्यांनी कधी जाती-धर्माचे राजकारण केले नाही. तर त्यांचे शिष्य पवारांची राज्यात राजकारणाची भूमिका उलटी आहे. त्यांनी काँग्रेसच्या शाळेत त्यांनी विचाराचे शिक्षण घेतले. पण ते पक्षात कधी रमले नाहीत. त्यांनी १९७८ काँग्रेसमध्ये बंड केले सत्तेत मिळविली. त्यांनी स्वतःचा पक्ष स्थापन केला.तसेच त्यांनी जाती- धर्माचे राजकारण करत आले आहेत, अशी टीका केली जाते. राजकारणात "किंगमेकर' म्हणून भूमिका बजावणे आवडते.त्यामुळेच त्यांनी श्रीमती सोनिया गांधी यांच्यावर विदेशी मुद्दावर टीका करून १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली.नंतर पुन्हा 'महाराष्ट्राच्या हितासाठी समविचारी पक्ष एकत्र आले पाहिजे, तशी भूमिका घेत त्यांचा पक्ष केंद्रात व महाराष्ट्रात सत्तेत राहिला.पण पक्षाचे काँग्रेस पक्षात विलीनकरण केले नाही.देशातील एक अनुभवी, ज्येष्ठ नेता म्हणून त्यांचेकडे बघितले जाते.पण त्यांच्या बदलत्या भूमिकेमुळे 'अविश्वासनीय नेते' म्हणून त्यांना बघितले जाते. यात पवार जे बोलतात ते कधीच करत नाहीत, त्यांच्या मनात काय चालत, हे अनेकांना याचा थांगपत्ता लागत नाही. पवारांना ओळखणे कठीण, असे काही पत्रकारच सांगत असत. महाराष्ट्रात त्यांचा चाणक्ष, मुसद्देगिरी नेता नाही, असे म्हटले जाते. पण त्यांच्यापेक्षा राजकारणात नवीन शिक्का असलेले फडणवीस त्यांच्यापेक्षा भारी ठरले आहेत. पवारांच्या दगाबाजीचा फडणवीसांना अनुभव आलेला आहे. पण २०१४ मध्ये राज्यात स्थिर सरकार असावे, म्हणून पवारांनी भाजपा व फडणवीस सरकारचे समर्थन दिले. पक्षातील सर्व नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी माझे म्हणणे ऐकले पाहिजे. पक्षातील नेत्यांनी माझे नेतृत्व मान्य केले पाहिजे, पक्षात माझे आदेश मानले जावेत. असे पक्षाचे अलिखीत आदेश आहेत. पक्षात त्यांचीच एकाधिकारशाही' आहे. त्यांनी राजकारणात स्वतंत्रपणे ४५ वर्ष राजकीय नेतृत्व केले. पण त्यांना राज्यात कधीच पक्षाची एकहाती सत्ता आणता आलेली नाही, पण देशात नवीन नेत इतर राज्यातील नेत्यांनी आपल्या पक्षाची राज्यात आणली आहे. पण पवारांना ते जमले नाही. यात राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे मताधिक्य घटत गेल्याने पक्षाची राष्ट्रीय मान्यता गेली. २०१९ मध्ये महाराष्ट्रात भाजपा आणि शिवसेनेला सर्वाधिक जागा मिळाल्या होत्या. तेंव्हा पवारांनी संजय राऊत यांचे मदती घेऊन शिवसेनेशी भाजपापासून तोडण्याचे षडयंत्र रचले. त्यांनी राज्यातील जनमताचा अनादार केला. त्यांनी केवळ सत्तेसाठी शिवसेनेला सोबत घेतले, तेंव्हा ते अनैतिक नाही काय? तेंव्हा पवारांनी फडणवीसांशी सत्ता स्थापनेबाबत चर्चा केलेली होती. त्यानंतरच फडणवीस व अजित पवारांचा सकाळचा शपथविधी झाला होता. यावेळी पवारांनी अचानक-पणे भूमिका बदलली. त्यामुळे सरकार सत्तेत आले नाही.यात दादा व फडणवीस यांचेवर टीकेचे झोड उठली होती. यात दोघांना अवमान व बदनामी सामोरे जावे लागले. पण या प्रकरणात पवारांनी आपले पुतणे अजितदादांना अंधारात ठेवले. त्यांना तोंडघासी पाडले.यात दादांनी बंड केल्याचे असे राजकीय चित्र उभे केले गेले. यात दादांवर माघार घेण्याची नामुष्की ओढवली.पवारांच्या भूमिकेमुळे दादा नाराज झाले.



पण ते मौन पाळत होते.पण नुकतीच शरद पवार व फडणवीस यांच्यात मुलाखतीचा कलगीतुरा झाला. त्यात पवार यांनी फडणवीस यांचेशी सत्तेसाठी चर्चा झाल्याचे मान्य केले. त्यांनी स्वतः फडणवीस यांची विकेट घेतल्याचे मान्य केले. पण या त्यांच्या राज्यातील राजकारणातील कपटनीतीचा भाग होता, हे यातून उघड झाले. त्यात पक्षाची ताकद कमी होत असताना पक्षात आता भाकरी फिरविण्याचे नाटक केले. पक्षाची सूत्रे आपल्या मुलीकडे दिले! यात अजित दादा राजकारणात ज्येष्ठ व अनुभवी नेते असताना त्यांना मात्र पध्दतशीरपणे बाजूला सारले गेले. त्यावेळी त्यांची नाराजी दिसत होती. पण ते गप्प बसले. पण दादा पक्षाला व पवारांना धडा शिकवतील, असे वाटत होते.यासाठी ते संधीची वाट पहात होते. हे सर्व अचानक घडले असे नाही. दरम्यान दादा व फडणवीस यांचेत भेटी व दादांच्या भाजपा व मोदी सरकारबाबत कौतूक करत होते. दादा आणि भाजपा नेत्यात भेटी व चर्चा होत होती. जेंव्हा भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने हिरवा झेंडा दाखविला. त्यानंतर अजित पवार व इतर त्यांच्या इतर नेत्यांनी बंड केले. इतकेच नव्हे, त्यांनी आपला गट राष्ट्रवादी काँग्रेस खरा पक्ष असल्याचा दावा केला आहे. त्यांनी आपणाला ३५ आमदारांचे समर्थन असल्याचे म्हटले आहे. आता दाबांनी शरद पवार पक्षातून काढले आहे.पक्षातील२/३ आमदार म्हणजे, ३६ आमदार हे जर दादांचे समर्थन दिले, तर त्यांचेवर पक्षांतराची कारवाई होऊ शकत नाही. त्यांच्या गटातील नेत्यांचा मंत्री शपथविधी झाला. पण यामुळे शिंदे शिवसेना गटात अवस्थतता निर्माण झाली आहे. शिंदे यांनी आपल्या साथीदारांना धोका दिला, असे म्हटले जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अनेक नेते नाराज होते. पक्ष दादा कधी बंड करु शकतात. शेवटी त्यांनी धाडस केले. पण पवारांना पक्ष फुटेल, याचा अंदाज घेता आलेला नाही. जेंव्हा ठाकरे यांचे नाकाखालून चाळीस आमदार गेले, तरी त्यांना कळाले नाही, तेंव्हा त्यांचे मुसद्देगिरीवर प्रश्न केला होता. मग पवारांचा मुसद्देगिरीपणा कोठे गेला? शरद पवार हे देशात राजकारणात आपणच शहाणे आहोत, अशा अविर्भावात उपदेश करत आले. आता त्यांनी निवृत्ती घ्यावी! गेल्या ४५ वर्षात महाराष्ट्राचे भले झाले नाही? आता महाराष्ट्राचे काय भले होणार आहे? राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीचे खापर भाजपावर फोडले जात आहे, याचे आश्चर्य वाटते!

काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व उध्दव ठाकरे नेते तर भाजपाचे अनेक आमदार संपर्कात आहेत, असे म्हणत होते. पण त्यांना भाजपाचा एकही आमदार फोडता आलेला नाही.उलट शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात बंड झाले. त्याला पक्षातर्गंत नाराजी, हेच मुख्य कारण आहे. ज्यांना स्वतःच्या पक्षाचे घर सांभाळता आलेले नाही,ते मात्र दुसऱ्याच्या घरावर दगड फेकून राग व्यक्त करत आहेत. जेंव्हा पवारांनी भाजपापासून शिवसेनेला तोडले. तेंव्हा तर मीडिया पवारांचे कौतूक करत होता. पवार जे करतात ते नैतिक व फडणवीस करतात ते अनैतिक हे कसे काय? पक्षातील बंडखोर नेते भाजपाला मदत देत असतील तर त्यांनी का नाकारावे ? भाजपाची विचारधारा पक्की असून ती 'तकलादू नाही. पण जैसी करणी वैसी भरणी' पवारांच्या दुप्पटी कपटनीतीमुळे पक्ष फुटलेला आहे.पवारांच्या शब्दात 'कोणी विकेट देत असतील, तर ती घेतली पाहिजे. मग फडणवीस यांनी गुगली टाकून शरद पवारांची विकेट घेतली तर मग चुकले कोठे ?आता महाराष्ट्राच्या राजकारणात काकाच्या विरोधात पुतण्याचे बंड! हा अध्याय जोडला जाणार आहे.

# जीवनातील वास्तव मांडणाऱ्या संजय व्यापारी यांच्या कविता



भगवान राईतकर
संपर्क क्र. ९७३०३३२१५१

आधुनिक केसरी

**अप्लाईड आर्टमध्ये पदवी घेतल्यानंतर संजय काशिनाथ व्यापारी यांनी १९८६ ते २०२० पर्यंत अनेक दैनिकांमध्ये आणि साहित्याला वाहिलेल्या मासिकांमध्ये विविध पदावर कार्य केले. साहित्यिक व पत्रकार म्हणून संजय व्यापारी यांचा परिचय संपूर्ण महाराष्ट्राला आहे. पत्रकारितेसोबत साहित्याचा जास्तीत जास्त प्रचार व्हावा आणि नव साहित्यिकांना एक हक्काचं व्यासपीठ मिळावं या उद्देशाने २३ जुलै २०२१ ला लोकमान्य टिळक जयंतीच्या मुहूर्तावर टिळकांचे विचार घेवून 'आधुनिक केसरी' या डिजिटल दैनिकाची स्थापना केली. संजय व्यापारी हे या डिजिटल दैनिकाचे युनिट हेड व व्यवस्थापकीय संपादक म्हणून कार्यरत आहेत. संजयजी व्यापारी यांच्या आतापर्यंत साधारणतः १५० पेक्षा अधिक कविता, १६० नवीन श्री मनाचे श्लोक आणि वास्तवावर आधारित अनेक लेख दैनिकातून प्रकाशित झाले आहेत.**

संजय व्यापारी यांची आणि माझी पहिली भेट श्रीरामपूर येथे पत्रकार रत्न पुरस्काराच्या निमित्ताने झाली. आम्ही दोघेही पत्रकार रत्न पुरस्काराचे मानकरी होतो. दैनिक आधुनिक केसरीच्या माध्यमातून सरांच्या कार्याचा परिचय मला झाला होता. पत्रकार रत्न पुरस्काराच्या निमित्ताने प्रत्यक्ष भेट झाली. चर्चेतून पत्रकारितेसोबतच सरांचा साहित्य क्षेत्रामध्ये व्यासंग अनुभवता आला. कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी कार्यक्रम हॉलमध्ये प्रत्येकजण वेगवेगळ्या विषयावर बोलत होते. मी, मात्र संजयजी व्यापारी सरांना बोलता- बोलता संजय सरांना कविता लेखनाविषयी विचारले.. आणि व्यापारी सरांच्या कविता श्रवणाचा योग आला. मागच्या महिन्यामध्ये सरांना फोन करून कविता मागितल्या आणि त्या कवितेविषयी लिहिण्याचा मोह आवरला नाही.

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामधील चालते- बोलते ईश्वर म्हणजे आई-वडील आहेत. लाखो कविता जरी आईवर लिहिल्या तरी, सुद्धा आईची महती पूर्णपणे वर्णन केला जाऊ शकणार नाही. आईशिवाय आपलं जगण्याचा आभाळा कसं सुन होतं. आई आपलं दैवत आहे. जगामध्ये स्वतः झीजून आपल्याला उभं करणारी एकमेव व्यक्ती म्हणजे आई. आई या शब्दाला दुसरा पर्यायी शब्द नाही. आईसारखे जगात दुसरे कोणीही नाही. परंतु अनेकांना हे सर्व आईचे महत्व ती गेल्यानंतर कळते, अशा प्रकारच्या भावना संजयजी व्यापारी यांनी त्यांच्या 'आईच फक्त आई असते...' या कवितेतून मांडताना म्हटले आहे की,

**आई सम दुसरे कोणी नसते**
**स्वतः झीजून सर्वांना उभं करते**
**आई मुळेच आपण असतो आईविना आभाळ सुन असते**
**आईच आपलं दैवत असते**
**हे आई गेल्यावर कळते**
**आई फक्त आई असते...**

आई आणि वडील हे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामधील महत्त्वाचे घटक आहेत. आई पाहिजेत आणि वडील नको किंवा वडील पाहिजेत आई नको, असं कुणालाही म्हणता येणार नाही. कारण, प्रत्येकाच्या जीवनामध्ये दोघांचेही अनन्यसाधारण महत्त्व आहे. आई इतकेच वडीलही मुलाला घडविण्यासाठी अपार कष्ट उपस्थित असतात. परंतु, त्याची जाणीव ते आपल्या मुलाला होऊ देत नाहीत. प्रत्येक वडीलांनी आपल्या कष्टाची जाणीव मुलाला करून द्यावी, असे कवीला वाटते. कदाचित, वडिलांच्या कष्टाची जाणीव जर मुलांना झाली किंवा माहिती जर झाली तर त्याच्या मनामध्ये वडिलांच्या कष्टाचा आदर निर्माण होईल आणि तो आपले जीवन अधिक प्रगतीपथावर जोराने नेईल, असे कवीला वाटते. बाबांनी सर्व कष्ट आणि अडचणी मुलांसमोर मांडाव्यात. त्यांनी त्या मांडल्या नाहीत म्हणून परिस्थितीची जाणीव मुलांना होत नाही. मुलाचं भलं व्हावं, हा उद्देश जरी, वडीलाचा असला तरी, कवी संजयजी व्यापारी त्यांच्या 'बाबा तुमचं खरंच चुकलं...' या कवितेच्या माध्यमातून वडिलांनी जीवनातील वास्तव आपल्या मुलासमोर मांडावे, अशी एक भूमिका त्यांनी घेतलेली आपल्याला कवितेच्या पुढील ओळीतून दिसते -



**मुलांसाठी आयुष्य**
**झिजवलं**
**स्वतःच दुःख सतत लपविलं**
**घरासाठी एवढं केलं**
**तुमच्या फाटक्या बनियनमधून**
**तुमचं हृदय आम्हा कधीच नाही दिसलं**
**बाबा तुमचं खरंच चुकलं...**

जीवनाची जगण्यातील धुंदी ही प्रत्येक व्यक्तीला सुखापर्यंत घेऊन जात असते. प्रत्येकाने आपलं मन जर, भक्तीचा मळा केला... दुर्मिळ जीवन आहे.... हे जर, प्रत्येकाला समजले... तर, त्या व्यक्तीने जीवनातील प्रत्येक गोष्ट जिंकली. कारण, अशा प्रकारच्या तल्लीनतेमध्ये जर, प्रत्येकाने आपले जीवन जगले तर, आपल्या प्रत्येकाच्या जगण्यामधील धुंदी प्रत्येकाला सुखाच्या व्दारी घेऊन जाईल, व्यसनाची धुंदी व्यक्तीच्या जीवनामध्ये दुःख आणते. परंतु, जीवन जगण्याची धुंदी ही प्रत्येकाच्या जीवनामध्ये सुखाचे आणि आनंदाचे दरवाजे खुले करते, अशा प्रकारचा भाव संजयजी व्यापारी यांनी ' जगण्यात असावी धुंदी ' या कवितेमध्ये व्यक्त केलेला दिसतो -

**मन मळा करा भक्तीचा हे जीवन असते दुर्मीळ**
**ज्याला हे सारे कळले जिंकला तोच मग सारे**
**ही धुंदीत असते न्यारी नेईल सुखाच्या द्वारी**

प्रत्येकाच्या जीवनामध्ये पहिल्या गोष्टीला फार महत्त्व असते. मग, ती कोणतीही असो... ऐन तारुण्याच्या अवस्थेमध्ये जर, एखाद्या तरुणीची पहिली भेट जर, झाली असेल तर, ती भेट अविस्मरणीय असते. त्या पहिल्या भेटीची आणि अविस्मरणीय आठवणीची आठवण करून देणारी संजयजी व्यापारी यांची 'पहिली भेट' ही कविता वाचकाला भूतकाळातील अविस्मरणीय आनंद देणारी ठरते. अशा अविस्मरणीय आठवणीविषयी व्यापारी सर लिहितात-

**आयुष्याच्या कॅनव्हासवर**
**हेडिंग सारखी कोरली जाते**
**प्रत्येकाच्या आयुष्यात**
**ही पहिली भेट अविस्मरणीय ठरते...**

पहिल्या भेटीची अविस्मरणीय आठवण वाचताना वाचकाला तल्लीनता प्राप्त होते... आणि नकळत त्या व्यक्तीच्या प्रेमाचा पुढील प्रवास सुरू होतो. असं म्हणतात, प्रेम डोळ्यात असते. अशाच डोळ्यांचा उत्सव सांगणारी संजयजी व्यापारी यांची कविता

'या नव नवल नयनोत्सवा...' ही कविता. या कवितेतील इशारे, बाण, क्रोधातून पाझणारे प्रेम, नयनाचे अनंत रूप, अश्रूचे वाहने , ममतेचा सागर, अभिनयाची खाण, जादुई नजर असे सर्व वर्णन कवी करीत असताना... सहजपणे लाख - हजार आजपर्यंत फसले असल्याची कबुली देऊन जातात. नयनोत्सवा मधील नयन कधी डोळे वाटतात तर, कधी नयन नावाची सुंदर तरुणी वाटते. नयन म्हणजे डोळे की, सुंदर तरुणी असा प्रश्न मात्र वाचकाच्या मनामध्ये राहतो. या ठिकाणी या कवितेमधील अनुभव हा प्रत्येक वाचकाला आपला वाटतो, हे मात्र निश्चित... आपलाही अनुभव काय आहे ते, कवितेच्या ओळी वाचून बघा...!

कधी इशारे करती डोळे तर
कधी मारती बाण नयनाचे
कधी रोखती क्रोधाने तर कधी पाझरे प्रेमाने
अनंत तुझे रुप नवल हे कोणाही भुलवावे सहजी क्षणात अश्रुंचे वहाती
तर क्षणात ममतेचा सागर
**निसर्ग सारा साठवते**
**या छोट्या दोन नयनांत तू**
**अभिनयाची खाण जसे तू**
**क्षणा-क्षणाला बदलते रूप**
**तुझ्या जादूई या नजरेने**
**फसले आजपर्यंत लाख- हजार**

तरुणीच्या मनातील बालपणीची आठवण जागृत करणारी कविता 'राहिले दूर घर माझे' . यामध्ये वय वाढल्यानंतर वयानुरूप आलेल्या जबाबदाऱ्या आणि त्यामध्ये अडकलेली तरुणी हिच्या बालपणीच्या कुटुंबाशी संबंधित असलेल्या आणि मित्र-मैत्रिणीच्या आठवणीला उजाळा देणारे कविता संजय व्यापारी यांनी लिहिली आहे. कवितेमधील तरुणीच्या बालपणीच्या आठवणी आणि कुटुंबातील व्यक्तींचा सहवास हा आता आठवण म्हणून केवळ तिच्या जीवनामध्ये उरलेला आहे, असा भाव व्यक्त करणारी संजयजी व्यापारी यांच्या कवितेतील ओळी...

**आपले सारे दृष्टी आड झाले**
**जीवन कसे क्षणात बदलले**
**जबाबदारीत मी अशी अडकले**
**आठवणी शिवाय काही न उरले**
**सारे काही मागे सुटले सख्या रे**
**राहिले दूर घर माझे**

प्रेमात पडलेल्या प्रियकराला प्रेयसीचे प्रत्येक रूप आणि प्रत्येक ढंग वेगळे वाटतं. तिचा विरह त्याच्यासाठी जीव घेणार असतो. तिचं पडलेल स्वप्न गोड असते. तिच्यासारखं सुंदर दुसरं कोणीही जगामध्ये त्याला दिसत नाही. कवितेमधली राणी हा शब्द वाचकाच्या मनामध्ये प्रश्न निर्माण करू शकतो ? नेमकी राणी कोणती ? लग्नानंतरची की, प्रेयसी ? काहीही असो ! परंतु, प्रेमात पडणाऱ्या व्यक्तीची अवस्था काय होते... याचे चित्रण करणारी संजयजी व्यापारी यांची 'न्यारा तुझा ढंग गं...' ही कविता आणि त्यातील काही ओळी....

**गोष्ट तुझी जगायेगळी ओढ चारी ठाव गं**
**विरह तुझा जीवघेणा स्वप्न तुझं ग्वाड गं**
**तुझ्यावानी आणिक कोणी**
**शोधून सापडणार नाही गं**
**काहीही म्हण राणी पण**
**न्यारा तुझा ढंग गं...**

संजय व्यापारी यांच्या कविता प्रत्येकाच्या जीवनामधील वास्तव मांडणाऱ्या आहेत. संजयजी व्यापारी सरांना साहित्य लेखनासाठी, पत्रकारितेसाठी आणि उत्तम आरोग्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा !



# महापालिका सुविधा देण्यात अपयशी : आ. फारुक शाह

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आमदार फारुक शाह यांनी मनपा प्रशासनाविरोधात क्युमाईन क्लबजवळ एकदिवशिय उपोषण करण्यात आले.

धुळे महापालिका नागरिकांना सुविधा देण्यात अपयशी ठरली आहे. कारण भाजपाचे जेवढे नगरसेवक आहेत, ते केवळ भ्रष्टाचार करुन आपली घरे भरण्याचे काम करत आहेत. त्यासाठी ते धुळेकरांना वेठीस धरत असून पठाणी वसूली करत आहेत. गतकाळात जेवढा भ्रष्टाचार भाजपेयींनी केला, त्यापेक्षा मोठा भ्रष्टाचार त्यांना करायचा आहे, त्यामुळेच अव्वाच्या सव्वा घरपट्टी आकारुन वसूली केली जात आहे. परंतु, आम्ही घरपट्टीची वाढ होऊ देणार नाही, त्यासाठी शासनस्तरावर लढा द्यावा लागला तर त्यासही मी तयार असल्याचा पक्का निर्धार आ. फारुख शाह यांनी केला आहे.

आ.शाह यांनी आज घोषणेप्रमाणे मनपातील भ्रष्टाचार व अकार्यक्षम कारभाराविरोधात उपोषण सुरु केले; यावेळी ते बोलत होते. शहरात दहा-दहा दिवसाआड होणारा पाणीपुरवठा, वाढीव घरपट्टी, अनियमित कचरा संकलन, बंद असलेली सार्वजनिक शौचालये या मुद्द्यांना उपस्थित करत आ. शाह यांनी महापालिकेविरोधात रणशिंग फुंकले आहेत. महापालिकेतील भ्रष्टाचार व अकार्यक्षम कारभाराविरोधात त्यांनी पाच दिवसांपुर्वीच उपोषणाचा इशारा दिला होता. त्यानुसार आ. शाह यांनी काल सकाळी उपोषणाला सुरवात केली. तथापि, आ. शाह यांनी उपोषणाचा इशारा दिल्यानंतर मनपा प्रशासनाने त्यांच्या मागण्यांसदर्भात खुलासे सादर करत उपोषण मागे घेण्याची विनंती केली होती. परंतु, सदर खुलासे हे दिशाभूल करणारे व धादांत खोटे असल्याचे सांगत आ. शाह यांनी उपोषणाचे अस्त्र उगारले. आ.शाह यांचे सोबत नगरसेवक नासिर पठाण, नगरसेवक सईद बेग, नगरसेवक मुक्तार अन्सारी, नगरसेवक आमिर पठाण, माजी नगरसेवक साजीद साई, डॉ.दिपश्री नाईक, प्यारेलाल पिंजारी, डॉ. शराफत अली, निजाम सैय्यद, कैसर अहमद, शोएब मुल्ला, डॉ.बापुराव पवार, इकबाल शाह, जमील खाटीक, सउद सरदार, रिझवान अन्सारी, आसिफ मुल्ला, अनिस शाह, सुलेमान मलिक, शकीला शेख, साईदा शेख, सुलताना मिर्झा ,तब्बासूम शाह, शाहीन मणियार आदी उपोषणात सहभागी झाले.

# टिटवी जि.प. शाळेत वसंतराव नाईक जयंती उत्साहात साजरी



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील टिटवी-पळसखेडा येथे जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा टिटवी येथे हरित क्रांतीचे प्रणेते वसंतरावजी नाईक यांची ११० वी जयंती दि.१/७/२३ रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महानायक वसंतरावजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मुख्यध्यापक अरुण गवळी यांनी वसंतराव नाईक साहेबांचे प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. हरित क्रांतीचे प्राणनेते वसंतराव नाईक साहेब बहुआयामी कार्य विद्यार्थ्यांना मार्मिक शब्दांत पटवून देत कृषी दिनाचे महत्व सांगत वृक्षावल्ली आम्हा सोयरे या उक्तीप्रमाणे एक मुल एक झाड लावण्यासाठी प्रेरित केले. शाळेतील कौशल्या,कला तसेच सर्व शिक्षकवृंद व अंगणवाडी सेविका

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा टिट्वी येथे हरित क्रांतिचे प्रणेते, महाराष्ट्रा चे माजी मुख्यमंत्री आदरणीय वसंतराव जी नाईक साहेब यांची जयंतीकृषिदिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली! सर्वप्रथम मा वसंतराव नाईक साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले! शाळेचेसह शिक्षक मोरे सर यांनी, मा वसंतरावजी नाईक यांच्या जीवनावर प्रकाश टाकतांना त्यांनी जे महाराष्ट्र सुजलाम सुफलाम करण्यास भरीव असे कार्य केले त्याची माहिती विद्यार्थी व उपस्थित, नागरिकांना सांगितली, नंतर शाळेचे सहशिक्षक डी आर मख सर यांनी मा वसंतराव नाईक साहेब यांनी केलेल्या कार्याची माहीती विद्याथ्याना सांगितली गावातील शिक्षक प्रेमी भुरलाल जाधव यांनी, मा वसंतराव नाईक साहेबांनी केलेल्या कार्याची माहिती दिली! शेवटी शाळेचे मुख्याध्यापक यांचे अध्यक्षीय भाषण झाले, शेवटी शाळेचे पदवीधर शिक्षक जी. एन. चांदणे सर यांनी कार्यक्रमास उपस्थित सर्वाचे आभार मानले.या कार्यक्रमास, सरपंचपती भागवत जाधव,उपसरपंच लहू राठोड़ ग्रा पं सदस्य दिलीप जाधव, कय्यूम तड़वी,पोलीस पाटील डी. टी. राठोड,शा व्य समिती अध्यक्ष युवराज राठोड, विष्णू राठोड शिक्षण प्रेमी प्रमोद पाटील, किशोर चव्हाण, अतुल चव्हाण, भुरलाल जाधव, विनोद जाधव, संदीप जाधव,दिनेश जाधव, प्रमुख पाहुने कर्तारसिंग भाऊ चव्हाण व नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'महाराष्ट्राचा बुलंद आवाज शरद पवार' खंडाळ्यात झळकले पोस्टर



आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**खंडाळा :** राज्यात राजकीय भूकंप घडल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्वेसर्वा शरद पवार हे कराड येथे प्रीतीसंगमावर यशवंतराव चव्हाण समाधी स्थळास अभिवादन करण्यास निघाले असता सातारा जिल्ह्यातील खंडाळा येथे त्यांचे आगमन झाले. स्वागता दरम्यान त्यांच्या समर्थनार्थ राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांकडून महाराष्ट्राचा बुलंद आवाज शरद पवार आणि दीपस्तंभ हे पोस्टर झळकविण्यात आले. कुणी कुठेही गेले तरी आम्ही शरद पवारांच्या सोबत असल्याचेच हातात घेतलेल्या पोस्टरवरून खंडाळ्यातील कार्यकर्त्यांनी दाखवून दिले.



# शेखर भाकरे यांनी वाढदिवसानिमित्त लावली 27 झाडे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** प्रत्येक जण आपापला वाढदिवस वेगवेगळ्या पद्धतीने साजरे करतो, कुणी केक कापून वाढदिवस साजरे करतो तर कुणी डीजे लावून वाढदिवस साजरे करतो. परंतु प्रत्येकाने आपल्या वाढदिवशी एक झाड लावून त्या झाडाचे संगोपन केले. तर निसर्गाला फार मोठे सहकार्य लाभेल. कारण झाडे हा निसर्गाचा महत्त्वाचा घटक आहे. हेच महत्व जाणून घेत युवा भारूडकार शेखर भाकरे यांनी त्यांच्या आज सत्ताविसाव्या वाढदिवसानिमित्त 27 झाडे लावून संकल्प पूर्ण केला. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. माणसाला एक दिवस जगण्यासाठी 15 किलो ऑक्सिजन लागतो, तो 15 किलो ऑक्सिजन 7 झाडे मिळून तयार करतात.

मग आज पर्यंत आपण सर्वांनी निसर्गाचा इतका मोठा ऑक्सीजन घेतला तर आपण प्रत्येकाने आपल्या वाढदिवशी एक झाड लावणं आपलं कर्तव्य आहे. या संकल्पनेतूनच युवा भारूडकार शेखर निरंजन भाकरे यांनी त्यांच्या आजच्या 27 व्या वाढदिवशी रहिमाबाद गावातील नागेश्वर मंदिर परिसरात तसेच जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात तसेच गावाच्या परिसरात गावचे सरपंच सुभाष नवल, उपसरपंच डॉ. सुनील खराडे, अमोल तोंगल, शाळेचे मुख्याध्यापक राऊत सर, सुनील साळवे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून 27 वा वाढदिवस साजरा केला. यावेळी सोनाजी सिरसाठ, संदीप निकम, अक्षय जाधव, किशोर बोडके, योगेश तोगल, रामेश्वर सिरसाठ, समाधान सिरसाट, तसेच शाळेचे शिक्षकवृंद व गावकरी उपस्थित होते. या उपक्रमात शेखर निरंजन भाकरे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# जंगलातांडा येथील खांबावरील बॅटरी चोरणारे दोन चोर जेरबंद

## सपोनि भरत मोरे यांची धडाकेबाज कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील जंगलातांडा येथे गावातील खांबावरील बॅटरी चोरट्यांनी चोरी केली असता मा. पोलीस अधिक्षक मनिष कलवानिया यांनी जिल्हयातील चोरी करणाऱ्या चोरटयांचा शोध घेवून त्यांना जेरबंद करण्याबाबत सुचना सर्व प्रभारी अधिकारी यांना दिल्या आहेत. यावरुन सिल्लोड उपविभागिय पोलीस अधिकारी डॉ. दिनेश कुमार कोल्हे साहेब यांनी अशा गुन्हयांचा जलद गतीने तपास करण्याबाबत मार्गदर्शन करुन गुन्हे उघडकिस आणून अशा घटनांना आळा बसणे कामी मार्गदर्शन केले. यावरुन फर्दापुर पोलीस स्टेशनचे पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक भरत मोरे हे त्यांचे तपास पथकासह फर्दापुर शिवारातील जंगलातांडा गांवामध्ये गु.र.नं. 89/2023 कलम 379 मध्ये फिर्यादी नामे नागोराव किसन गोरे वय 32 व्यवसाय नौकरी ग्रामसेवक मौजे जंगलातांडा ता. सोयगांव यांचे फिर्यादवरुन 8500 रुपये किंमतीची पांढऱ्या रंगाची पॉवरबॅट कंपणीची बॅटरी चोरी झालेली आहे, म्हणून गुन्हा रजिस्टरी दाखल केला त्यांचा तपास मध्ये सपोनि भरत मोरे व त्यांचे पोलीस पथकास गोपणीय बातमी मिळाली की. सोयगांव तालुक्यातील दोन इसम नामे महादेव नामदेव मुळे वय 19 वर्षे व्यवसाय शेती रा. भवानीपुरा ता. सोयगाव व त्यांचा साथीदार नामे सागर प्रकाश बारुड वय 25 वर्षे रा. वेताळवाडी ता. सोयगांव यांनी मध्यरात्री 12/30




वाजेच्या सुमारास वरील मुददेमाल चोरी केलेला आहे अशी गोपणीय बातमीदारामार्फत बातमी मिळाल्याने तपास पथक यांनी सोयगांव येथुन वरील दोन्ही इसमास अत्यंत चालाखीने ताब्यात घेवुन त्यांचे कडुन खालील वर्णणांचा 100 टक्के मुददेमाल जप्त करण्यात आला. मुद्देमाल 8500 रुपये किंमतीची पांढ-या रंगाची पॉवरबॅट कंपणीची बॅटरी जप्त करण्यात आली आहे.सध्या आरोपी पोलीस कस्टडी मध्ये असुन त्यांचे कडे सदर गुन्हयात त्यांचे आनखी कोणी साथीदार आहेत काय तसेच त्यांने सदर ची चोरी करुन वरील मुददेमाल कोणाला विकला होता काय यांचा कसून तपास सपोनि भरत मोरे फर्दापूर हे अधिक तपास करत आहे. नमुद कार्यवाई ही कारवाई सपोनि भरत मोरे फर्दापूर यांच्या मार्गदर्शनाखाली निलेश लोखंडे, प्रकाश कोळी, योगेश कोळी, भरत कोळी, सतिश हिवाळे, प्रदिप बेदरकर, योगेश खडके, कविता कुलथे यांनी मिळून केलेली आहे.



# लिंगभेदाचा आप-परभाव बाजूला सारुन नकार पचवणारे महिलांसारखेच सहनशील पुरुषही आता भारतीय संस्कृतीला घडवावे लागतील !

आधुनिक केसरी न्यूज



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226

पुण्यातील कोयता प्रकरणाची गंभीर दखल घेत आज दै अधुनिक केसरीने घडवून आणलेलं चर्चासत्र मोठं मौलिक आहे.यात सहभागी झालेल्या सर्व मान्यवर लेखकांनी आपली ठाम भूमीका मांडली आहे.ही विचारांची देवाण-घेवाण घडंत रहाणं, घडवून आणणं काळाची गरज आहे.तरुणाईला 'इतरांच्या भावना जपायला शिकवणं' गरजेचं आहे. या चर्चासत्रात सहभागी सर्व मान्यवर लेखकांचं हार्दिक अभिनंदन आणि जनचर्चेचे संयोजक लेखक बाळासाहेब जोगदंड आणि संपादक डॉ. प्रभू गोरे सराचे हार्दिक आभार..! प्रकृती,संस्कृती आणि विकृतीतली भेद रेषा सांगत मनाचं आरोग्य ढासळलेल्या माणसांकडून विध्वंसक पावलं उचलली जातात हे सुक्ष्म निरिक्षण डॉ. सोनिया कस्तुरे यांनी नोंदवलं आहे. नकार पचवण्याच्या क्षमतेचा अभाव मुलांमधे आढळून येतो ही गंभीर अडचण आहे. आणि त्यामुळंही अशा घटना घडंत आहेत.

माणसांचा मानसिक विकास दुर्लक्षीत रहातो आहे,शिक्षणातून नैतीक मूल्यांची रुजवण होत नाही.आपल्या भवतालाचं वातावरणही सुदृढ असायला हवं असे ठोस मतं लेखिका अनुराधा कुलकर्णी यांनी मांडली आहेत. मुलं अनुकरण करतात.महिलांना वस्तू म्हणून वापरायचं आणि त्या गरजेपोटी अत्याचार करायचा ही पुरुषप्रधान मानसिकता याला जबाबदार आहे. पुरुष या परंपरांनी घडवला आहे.स्त्रियांसारखाच सहनशील पुरुषही आता 'घडवावे' लागतील हे रास्त निरिक्षण मानसशास्त्र तज्ञ शीला घरडे पाटील यांनी नोंदवलं आहे. तरुणाई राजे शिवरायांचा स्त्रीयांप्रती आदरभावाचा विचार शिकले नाहीत ही खंत व्यक्त करीत महिलांना समाजात वावरणं अडचनीचं व्हावं याबद्दल लेखिका सीमा देशमुख यांनी खंत व्यक्त करत महिलांचा सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर घेतला आहे. सुसंस्कृत पुण्याला ही शरमेनं मान खाली घालायला लावणारी घटना असल्याची नोंद लेखक वसंत राठोड यांनी केली आहे.पोलीस प्रशासनाचा वचक, दामिनी पथक आणि प्रबोधनाची आवश्यकता असल्याचेही नमूद केले आहे.

# पो.निरीक्षक सतीश निकम यांचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतिश निकम यांचे बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी व भारतीय बौद्ध महासभेच्या पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले. यावेळी उरण तालुका वंचित बहुजन आघाडी अध्यक्ष तुकाराम खंडागळे, भारतीय बौद्ध महासभा उरण तालुका अध्यक्ष अमोल शेजवळ, उरण शहर प्रमुख मुजमील तुगेंकर, उरण संस्कार उपाध्यक्ष सदानंद सकपाळ व इतर कार्यकर्ते उपस्थित होते. वंचित बहुजन आघाडी तालुका



उरण, भारतीय बौद्ध महासभा तालुका उरण तर्फे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम यांना गुलाब पुष्प देऊन त्यांचे स्वागत केले.



# निसर्गप्रेमी हितेंद्र घरत यांच्याकडून उरण येथे दहा लाख बियांचे रोपण

आधुनिक केसरी न्यूज

**विठ्ठल ममताबादे**

**उरण :** सिडको अधिकारी तसेच निसर्ग प्रेमी गडप्रेमी हितेंद्र घरत हे वेगवेगळ्या डोंगरावर गेली 25 वर्ष बिजारोपण करीत आले आहेत. यंदा 26 व्या वर्षी खारघर येथील फणसवाडी येथील डोंगरावर मान्यवरांच्या उपस्थितीत 10 लाख बीजांचे रोपण करण्यात आले.

आपल्या देशात व राज्यात वाढत्या औद्योगिकारणामुळे निसर्ग लोप पावत चालला आहे. यामुळे पर्यावरणाचा समतोल ही ढासळत चालला आहे. त्याचे दुष्परिणाम सर्वांनाच सोसावे लागत आहे. यासाठी झाडे लावणे गरजेचे आहे. हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून उरणमधील निसर्गप्रेमी हितेंद्र घरत हे गेली 25 वर्षे फळांच्या हजारों बिया गोळा करून त्या पावसाळ्यात रस्त्याच्या कडेला अथवा किल्ले-रानावनात टाकीत आहेत. त्यातील शेकडोंच्या संख्येने झाडे जगून याचा फायदा तुम्हा आम्हाला व प्राण्यांना तसेच निसर्गाचीही जपवणूक करण्याचा त्यांचा स्तुत्य उपक्रम सुरू आहे. त्यांच्या या उपक्रमाचे इतरांनी अनुकरण करणे गरजेचे आहे.

थेंब थेंब पाणी साचून तळे बनते एक एक झाडांपासून जंगल बनत म्हणून केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे. पेरू तरच उगवेल या उक्ती प्रमाणे मे महिना म्हणजे फणस, आंबे, काजू, चिंच, करवंदे ,जाम, जांभळे, रांजणे अशा अनेक फळे खायची चंगळ असते. परंतु आपण या फळांचा आस्वाद घेऊन त्यांच्या बिया फेकून देतो. मात्र तसे न करता खाल्लेल्या फळांच्या बिया एक भांड्यात जमा करा. उदाहरणार्थ, तुम्ही आमरस केला त्या आंब्याचे बाठे, जांभळाचा रस काढलात त्या जांभळाच्या बिया, चींच जेव्हा कटिंग करतो त्याचे निघालेले चिंचोके, काजू ,फणस खाल्ल्यानंतर त्याच्या निघालेल्या बिया अशा अनेक फळांच्या बिया कृपया फेकून देऊ नका. त्या जमा करा त्यांना चांगल्या उन्हात सुकवा. नंतर एका पिशवीत किंवा गोणीत भरून ठेवा व त्या सर्व सुकलेल्या बिया पावसाळा सुरू होण्याअगोदर कुठल्या तरी किल्ल्याच्या सभोवती किंवा रानात, जंगलात किंवा कुठल्याही रस्त्याच्या दोन्ही बाजूस थोड्या थोड्या टाकत जा. हितेंद्र घरत व त्यांचे कुटुंब हे इतरांनी खालेले फळ बिया आपल्या घरी आणून त्या धुवून, सुकवून आवषधिकरण करून जमवून ठेवतात. अशा प्रकारे 10 लाख बियांची साठवणूक करून त्याचे रविवार दि.2 जुलै रोजी नवी मुंबई खारघर येथील फणसवाडी डोंगरावर रोपण करण्यात आले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी हितेंद्र घरत,त्यांच्या पत्नी, मुले व हिंदी सिनेमासृष्टीतील अभिनेत्री पुजा मॅडम, अभिनेते कुणाल मेश्राम,आचार्य ज्योतीषा र्य मनमोहनजी, फोरेस्ट मुंबई विभाग चीफ मॅनेजर-सौ. बिरारी मॅडम, फोरेस्ट झोन मॅनेजर नवी मुंबई - बिरारी सर, ज्ञानेश्वर सोनावणे-समाजसेवक, डॉ. साठे,सिडको चे आर्किटेक सचिन माथनकर, आर्किटेक्ट आशिष चव्हाण, सिडको कर्मचारी युनियनचे जनरल सेक्रेटरी जे टी पाटीक, जॉईंट सेक्रेटरी सुभाष पाटील, सेवानिवृत्त मरिन ब्लॅक कॅट कमांडो रवी कुलकर्णी, अशोक कुमार शर्मा, भूषण शर्मा व नवी मुंबईचे जेष्ठ समाज सेवक परशुराम रघुनाथ पाटील, पत्रकार, मित्रमंडळी व हितचिंतक आदी उपस्थित होते.

# वैजापुरात शहीद अब्दुल हमीद यांना अभिवादन



आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** १९६५ च्या पाकिस्तान विरोधी युद्धात पाकिस्तानचे चार पॅटन रणगाडे नष्ट करणारे भारत मातेचे सुपुत्र परमवीर चक्र विजेता शहीद अब्दुल हमीद यांच्या जयंती निमित्त शनिवाररोजी रियाजखान पठाण, साबेरखान अशरफखान यांच्या मंडळ मार्फत गोशाळेतील गायींना चारा देण्यात आला. तर पोलिस निरीक्षक संजय लोहकरे यांनी स्वतः व १२सहकार्यासह या प्रसंगी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली तर वैजापूरचे भूमीपुत्र लष्करातील विरचक्र विजेता कचरू येडू साळवे,यांचा विशेष सन्मान ही करण्यात आला, परमवीर चक्र विजेता अब्दुल हमीद यांच्या प्रतिमेची डॉ. आंबेडकर पुतळा ते दर्गा बेस मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी सहभागी झाले होते. साळवे यांच्या समवेत माजी सैनिक सुदाम साळुंके, ज्ञानेश्वर कोलते,कपिल राऊत यांचा ही सन्मान करण्यात आला,सामाजिक कार्यकर्ते व माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी आपल्या प्रास्ताविकात परमवीर चक्र विजेता अब्दुल हमीद यांच्या शूरतेचच्या कार्यावर प्रकाश टाकला गेल्या १९ वर्षपासून अब्दुल हमीद जयंती वैजापूरात साजरी करण्यात येत आहे. या प्रसंगी नाशिक येथील हिंदू मुस्लिम हक्क व सुरस्क्षा व विकास महासमिती अध्यक्ष अंजुम मकरानी यांची प्रमुख उपस्थिती होती, या प्रसंगी व्यासपीठावर माजी उपनगराध्यक्ष साबेरखान,अखिल शेख, दिनेश राजपूत, गोकुळ भुजबळ, गणेश खैरे, शैलेश पोंदे यांची उपस्थिती होती,साबेरखान अशरफखान,रियाज पठाण, राजु पठाण,जाकीर कुरेशी,मोहसीनखान रियाज खान,मौजम शेख, चंदने पाटील, भाऊराव पाटील, सुलतान खान, खलील मिस्तरी ,अल्ताफ बाबा, हिकमत काका, सिकंदर भाई, आर.के.शेख, नाजीमोद्दीन यांनी उपस्थितांचे स्वागत केले.



# सिकल सेल ॲनिमिया निर्मूलन अभियानास कनकशीळ येथे सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील कनकशीळ उपकेंद्र येथे या मोहिमेच्या उदघाटनानंतर समुदाय आरोग्य अधिकारी डॉ रमेश शेळके यांनी सिकल सेल ऍनिमिया या व्याधीची तपासणी केली आणि हा आजार व त्याची लक्षणे याची माहिती देऊन वेळीच निदान करण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात या मोहिमेत सहभागी होण्याचे अवाहन करण्यात आले. राष्ट्रीय सिकल सेल ऍनिमिया निर्मुलन या शासनाच्या महत्वाकांक्षी अभियानाची सुरवात संपूर्ण देशपातळीवर आजपासून झाली आहे,त्याचाच एक भाग म्हणुन कनकशीळ आरोग्यवर्धिनी केंद्र येथे गावकऱ्यांच्या उपस्थितीत या अभियानाची सुरवात करण्यात आली असुन सिकल सेल ऍनिमिया हा रक्ताच्या संदर्भातील गंभीर आजार संपवण्यासाठी शासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. यावेळी आरोग्य सेवक अनिल बनकर, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ रमेश शेळके, आरोग्य सेविका ज्योती चिमणे, गट प्रवर्तक भागूबाई जाधव, आशा हिरा दांडगे,मदतनीस रंजना राणे व गावातील सर्व सन्माननिय सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ॲंबिशन किड्स प्री प्रायमरी स्कूलचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यातील बाळापुर आनंद नगर श्री.साईबाबा मंदिरासमोर अंबिशन किड्स प्री प्रायमरी स्कूलचे दिमाखात उद्घाटन करण्यात आल आहे. सदर हे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार आज तक चे रिपोर्टर श्री विशाल ठाकूर, व कर्तव्यदक्ष नगरसेवक संजय पाटील यांच्या हस्ते करण्यात आल आहे. याप्रसंगी पत्रकार श्री.विशाल ठाकूर, व नगरसेवक संजय पाटील, यांनी पालकांना आपल्या मनोगतातून समुपदेशन केलं. तसेच सर्वसामान्य पालकांच्या मुलांसाठी नर्सरी ज्युनिअर केजी व सिनियर केजी ची सोय उपलब्ध करून दिल्याने या मान्यवरांनी संचालक दीपक वाघ यांचं तोंड भरून कौतुकही व्यक्त केले. या शाळेच्या माध्यमातून मुलांच्या बौद्धिक क्षमतेनुसार शिक्षणाची तयारी केली जाणार आहे. या शाळेत उच्चशिक्षित अध्यापक शिक्षक असून प्रत्येक पाल्यांकडे वैयक्तिक लक्ष दिले जात असल्याने गावकऱ्यांसह प्रमुख मान्यवरांनी कौतुकही व्यक्त केल आहे.

या उद्घाटन सोहळ्याला ज्येष्ठ पत्रकार विशाल ठाकूर,



नगरसेवक संजय पाटील, संचालक दीपक वाघ, सामाजिक कार्यकर्ते, राहुल पाटील, दिनेश पाटील, प्रा.चंद्रकला वाडीले पत्रकार आकाश सोनवणे ,गणेश सुवालाल पाटील,पाटील यावेळी उपस्थित होते.तसेच सोहम पाटील,विपुल पवार, प्रवीण मोरे, साईराज बैरागी, जितेंद्र पाटील, विपुल साळुंखे, गौरव बडगुजर, यांसह आदींनी परिश्रम घेतले. याप्रसंगी नर्सरी ज्युनिअर व सिनियर केजी चे विद्यार्थ्यांसह गावातील प्रतिष्ठित नागरिक व पालक वर्ग, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# वणीकरांच्या माथ्यावर आघातांचा डोंगर

## एकत्रित अपघातांतील मृत्यूंची संख्या मोठी, सर्वत्र चर्चेचा विषय

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**लखमापूर :** दिंडोरी तालुक्यातील वणी हे तसे धार्मिक बाजूने संपूर्ण महाराष्ट्रात सुपरिचित, कारण साडेतीन पिठापैकी अर्ध पिठ म्हणून वणीच्या गडावरील देवीकडे पाहिले जाते. परंतु वणीकरांच्या वाट्याला एकत्रित अपघातात मुत्युचे प्रमाण जास्त का ? असा संपूर्ण वणीकर बांधवांना लागुन राहिला आहे. वणी परिसरात दररोज लहान-मोठे अपघात सत्र सुरू असल्याने वणीकर जनतेच्या तोंडाचे पाणी पळाले आहे. त्यामुळे आमच्या माथ्यावर अपघातांचे प्रमाणांचे गडद ढग का जात नाही.

असा प्रश्न सध्या वणीकरांच्या मनातून निघत आहे. कारण दररोजच्या अपघातात काही घरांतील कुटुंब नष्ट झाले तर काही घरातील कर्ते माणसे अपघातात कुटुंबांला मयत रूपाने सोडून गेले तर काहींच्या लेकराबाळांवर आपल्या घरातील कर्ते माणसे अपघातात मुत्यु पावल्याने उपासमारीची वेळ आली आहे.त्यामुळे आमच्या वाट्याला दुःखाचा डोंगर का ?असा धीरगंभीर सवाल वणी येथील काही कुटुंबातील नागरिकांनी दुःख व्यक्त करतांना केला आहे.



वणीमध्ये एकत्रित अपघातांचे प्रमाण हे दिवसेंदिवस वाढत असुन ही एक वणीकर जनतेसाठी गंभीर स्वरूपाची बाब होऊन बसली आहे . अशा घटना भविष्यात होऊ नये म्हणून आम्ही वणीकर जनता यंदाच्या नवरात्र काळात देवीसमोर विशिष्ट अशा महापुजेचे आयोजन करणार असून वणीकरांना या अपघातांच्या मालिकेपासुन सुटका देण्याचा प्रयत्न करणार आहे .

**प्रशांत आप्पा कड ( सभापती दिंडोरी कृ .उ .बा . समिती )**

**वणीकरांवर अनेकदा आघात :** वणीकरांच्या जीवनातील एकत्रित अपघातांची मालिका केव्हा संपणार ? आतापर्यंतचा एकत्रित अपघातांचे मुल्यमापन करतांना अनेकांच्या काळजांचा ठोका चुकविणारी मुत्युची आकडेवारी समोर येते .ती अशी . . ३७ वर्षांपूर्वी अजमेर यात्रेसाठी गेलेल्या पठाण कुटुंबांचा अपघात मध्यप्रदेशातील इंदुरजवळ होऊन कुटुंबातील चौघांचा जागीच मुत्यु झाला होता . दि .१२ फेब्रुवारी १९९७ रोजी प्रतिष्ठित व्यापारी कटारिया कुटुंबांवर काळाने घाला घालत एकाच कुटुंबातील चौघांचा जागीच मुत्यु झाला होता .दि .३१ जुलै २००३ रोजी घोटीजवळ मुंबई – आग्रा महामार्गावर वणीचे माजी उपसरपंच अशपाक मणियार यांच्या सह सहा जणांचा जागीच मुत्यु झाला होता . त्यात तिघे हे घोटीचे रहिवासी होते . दि .२८ जुन २०१४ मध्ये तुळजापूरला जाताना वणी जगदंबामाता मंदिराचे तात्कालीन अध्यक्ष संजय यशवंतराव थोरात यांचे दोन पुतणे व लखमापुर येथील त्यांचे मामा साहेबराव देशमुख असा चौघांचा कार अपघातात मुत्यु झाला होता . डिसेंबर २०१५ रोजी पाच मित्रांचा वणी–कळवण रस्त्यावर झाडावर कार अदाळुन मुत्यु झाला होता व तिघे गंभीर जखमी झाले होते . दि .२४जानेवारी २०१९ रोजी वणीतील प्रसिद्ध व्यापारी समदडिया हे भाचीचे लग्न आटोपून वणी येथे येत असताना चांदवड जवळ त्यांच्या कारला अपघात होऊन संजय समदडिया यांच्यासह त्यांच्या पत्नी व मुलगा अशा तिघांचा जागीच मुत्यु झाला होता . तर २०२२ च्या ऐन दिवाळीच्या लक्ष्मी पुजनांच्या दिवशी नाभिक समाजांचे जगदीश सोनवणे यांच्या पत्नी माहेरी गेल्या असताना गोदावरीच्या पात्रता सपना सोनवणे व त्यांची भाची एकाच वेळी पाण्यात बुडून मुत्यु पावल्या .तर दि .३०जुन २०२३ रोजी चौघां जिवलग मित्राचा दोन वाहनांची समोरासमोर धडक होऊन मुत्यु झाला . व ९ जण गंभीर जखमी झाले . त्यामुळे आतापर्यंत वणीकरांच्या डोळ्यासमोर जवळपास ३२ जणांचा मुत्यु एकत्रित अपघातात झालेला असुन असंख्य गंभीर जखमी झालेले आहे . तेव्हा आपल्या माथ्यावरील हे संकटाचे सावट केव्हा दुर होणार ? असा संकटमय प्रश्न सध्या वणीकर जनतेला सतावत आहे .



# वसंतराव नाईक यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्रा. शाळा सावळदबारा शाळेमध्ये आज दिनांक एक जुलै 2023 रोजी कृषी दिन व हरित क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष जाफर तडवी, सदस्य मोहन सुरडकर, अमजद तडवी , केंद्रीय मुख्याध्यापक श्री विठ्ठल राठोड सर हे उपस्थित होते. सूत्रसंचालन भागवत गायकवाड यांनी केले. हरित क्रांतीचे प्रणेते वसंतरावजी नाईक यांच्या विषयी व कृषी दिना विषयी शाळेचे मुख्याध्यापक व्ही. एल.राठोड सर यांनी माहिती दिली. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री गजानन गवई यांनी केले तर या कार्यक्रमासाठी अनिल चव्हाण सर यांनी प्रयत्न केले. जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा येथे हरित क्रांतीचे प्रणेते वसंतरावजी नाईक यांची ११० वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महानायक वसंतरावजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन सहशिक्षक व मुख्याध्यापक विलास राठोड यांच्या हस्ते पुष्पगुच्छ अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शिक्षक भागवत गायकवाड व सतीश ढोणे यांनी वसंतराव नाईक साहेबांचे बहुआयामी कार्य विद्यार्थ्यांना मार्मिक शब्दांत पटवून देत कृषी दिनाचे महत्व सांगत वृक्षावल्ली आम्हा सोयरे या उक्तीप्रमाणे एक मुल एक झाड लावण्यासाठी प्रेरित केले.

# फर्दापूर येथील दरोडेखोर एक वर्षासाठी हद्दपार

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील अजिंठा लेणी व्हिजीटर सेंटरवर दरोडा टाकून येथील विद्दुत रोहित्रातील कॉपर कॉईल व बाराशे लिटर ऑईल असा एकूण दोन लाख रुपयांचा मुद्देमाल लुटून नेणाऱ्या आठ पैकी पाच आरोपींना एक वर्षासाठी जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे.फर्दापूर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक भरत मोरे यांनी प्रस्तावावरून शनिवारी पोलिस अधीक्षक मनीष कलवानिया यांनी ही कारवाई केली आहे.शेख मुजीब शेख नुर ( वय ४२ ), शेख शाहरुख शेख नजीर ( वय २९ ), अजीम खान सादिक खान पठाण ( वय ३६ सर्व रा. वालसावंगी ता. भोकरदन, जि. जालना ) व रफिक खाजा शेख ( ४७, रा. रेंगटीपूरा मोंढा, छत्रपती संभाजीनगर ) आणि वसीम खान सत्तार खान ( ३२ रा. लाईन नं. ४ कैसर कॉलनी, छत्रपती संभाजीनगर ) अशी हद्दपार करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.मागील सहा वर्षांपासून बंद असलेल्या अजिंठा लेणी व्हिजीटर सेंटरवर २४ फेब्रुवारी २०२२ च्या रात्री आठ दरोडेखोरांनी दरोडा टाकून येथील सुरक्षारक्षकांना मारहाण केली होती. एका खोलीत डांबून ठेवून व्हिजीटर सेंटरमधील विद्युत रोहीत्रातील कॉपर कॉईल व बाराशे होता. असा सुमारे २ लाख रुपयांचा मुद्देमाल लुटून नेला होता.याप्रकरणी फर्दापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखा व फर्दापूर पोलिसांच्या पथकाने छत्रपती संभाजीनगर, नाशिक, जालना आणि मध्यप्रदेश येथे तपास केला.शेख मुजीब शेख नुर, शेख शाहरुख शेख नजीर, अजीम खान सादिक खान पठाण, रफिक खाजा शेख, वसीम खान सत्तार खान, शेख सोहेल शेख नजीर, दिलीप भगीरथ मालवीय व नौशाद आलम फजल शेख या आठ आरोपींना अटक करून त्यांच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेले वाहन व लुटलेला मुद्देमाल हस्तगत केला दरम्यान, या घटनेचा तपास करीत असताना अजिंठा व्हिजीटर सेंटरवर दरोडा टाकणाऱ्या आरोपींवर राज्यातील विविध पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल असल्याची बाब उघड झाल्याने फर्दापूर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक भरत मोरे यांनी व्हिजीटर सेंटरवर दरोडा टाकणाच्या आरोपींना जिल्ह्यातून हद्दपार करण्याचा प्रस्ताव उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. विजयकुमार मराठे यांना पाठवला. सदरील बाबीची चौकशी करून उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. विजयकुमार मराठे यांनी पाठवलेल्या चौकशी अहवालानंतर शनिवारी पोलिस अधीक्षक मनीष कलवानिया यांनी आठपैकी पाच आरोपींना एक वर्षासाठी जिल्ह्यातून हद्दपार केले .

फर्दापूर पोलिस ठाण्याचे सापोनि देवीदास लोखंडे, सापोनि भरत मोरे पो .ना . नीलेश लोखंडे, योगेश कोळी, सतीश हिवाळे यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली . सध्या हे दरोडा प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे .

**सहाय्यक पोलीस निरीक्षक भरत मोरे,**
**पोलिस स्टेशन फर्दापूर**

# पत्रकारांनी तब्येतीकडे दुर्लक्ष करता कामा नये

## श्रद्धांजली कार्यक्रमात रतनकुमार साळवे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** चितेपिंपळगावजवळ गारखेडा येथील धडाडीचे माजी सरपंच तथा ग्रामीण पत्रकार कल्याण देहाडे यांचे आकस्मिक निधन वेदनादायी आहे. अलीकडच्या काळात कल्याण देहाडे यांना आर्थिक समस्यांनी ग्रासलेले होते,असे प्रतिपादन रतनकुमार साळवे यांनी केले. दैनिक अटल मत कार्यालयात शनिवारी कल्याण देहाडे यांची श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात आली होती. या श्रद्धांजली सभेत अनेक पत्रकारांनी देहाडे यांच्या पत्रकारितेविषयी आठवणींना उजाळा दिला. रतनकुमार साळवे यांनी सांगितले की कल्याण देहाडे हे एक चांगले पत्रकार होते. त्यांना राजकारणात ही यश आले होते. ते ग्रामीण भागात लोकप्रिय होते. संपादक रशपाल सिंग अट्टल म्हणाले की,कल्याण हे माझे चांगले सहकारी होते. त्यांनी पत्रकारितेतून ग्रामीण जनतेचे प्रश्न मांडले. दैनिक सत्यनितीचे संपादक देविदास कोळेकर यांनी सांगितले की, देहाडे हे



माझे चांगले मित्र होते ते सकारात्मक विचारांचे व सर्वांना साथ देणारे पत्रकार होते. हे सांगत असताना त्यांना अश्रू अनावर झाले.जेष्ठ पत्रकार ज्ञानेश्वर खंदारे म्हणाले की, कल्याण देहाडे यांचे निधन चटका लावणारे आहे.देहाडे यांची पत्रकारिता वंचित समाजासाठी होती. जेष्ठ पत्रकार राजू वाघमारे म्हणाले की कल्याण देहाडे हा खरोखरच चांगला माणूस होता. वयाच्या ५२व्या वर्षी त्यांचे निधन व्हावें ही एक शोकांतिका आहे. देहाडे यांचा आकस्मिक निधनाचा संदर्भ लक्षात घेऊन राजू वाघमारे यांनी पत्रकारांच्या आरोग्य तपासणीची सूचना केली. सामाजिक कार्यकर्ते सुधाकर आठवले यांनी सांगितले की जेव्हा,जेव्हा हाक मारली तेव्हा, तेव्हा कल्याण धावून येत असत. ते एक चांगले पत्रकार होते.पत्रकार प्रा. अंकुश शिंदे यांनी सांगितले की कल्याण हे सर्व सहकार्य करणारे व्यक्ती होते. अँड. अशोक राठोड यांनीही कल्याण देहाडे यांच्या कार्याचा गौरव केला. या श्रद्धांजली सभेला शहरातील रशपाल सिंग अट्टल, रतन कुमार साळवे, गजानन इंगळे,देविदास कोळेकर, अँड.अशोक राठोड, संजय व्यापारी, बबनराव सोनवणे, राजू पडवळ,फिरोज शेख, राजू राठोड, राहुल डोंगरे,विजय सोनवणे, गोरख जैस्वाल,राज ठाकरे,ज्ञानेश्वर खंदारे,अमोल वाघुले, गणेश पुजारी, राजू वाघमारे,सुधाकर आठवले,अंकुश शिंदे,प्रवीण बोर्डे,मधुकर मघाडे,जगन्नाथ सुपेकर आदींची यावेळी उपस्थिती होती. या श्रद्धांजली सभेतच रशपालशिंग अट्टल यांनी दिवंगत कल्याण देहाडे यांच्या कुटुंबीयांसाठी आर्थिक मदतीचे आवाहन केले. त्याला प्रतिसाद म्हणून उपस्थित पत्रकारांनी सामाजिक बांधिलकी जपत, देहाडे यांच्या परिवारास आर्थिक मदत करण्याची घोषणा केली. ही मदत जमा झाल्यानंतर लवकरच कल्यान देहाडे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या कुंटुंबियांना सुपूर्द केली जाणार आहे. कल्याण देहाडे यांना मदतीसाठी पत्रकारांनी, दानशूर व्यक्तीनी समोर येऊन मदत करण्याचे आवाहन देखील एडिटर अँड प्रेस रिपोर्टर असोसिएशनचे अध्यक्ष रतन कुमार साळवे यांनी केले आहे.



# वेरूळ घाटात अपघात टळला; बस रस्त्यावरून घसरली

आधुनिक केसरी न्यूज

**हरिदास सराटे**

**खुलताबाद :** जगप्रसिद्ध वेरूळ लेणीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील घाट पावसाळ्यात धोकादायक बनला आहे. आज सकाळी देखील नंदूरबारला जाणारी एसटी बस खुलताबादनजीक वेरूळ घाटात घसरली. मात्र, दुर्दैवाने बसमधील २४ प्रवासी बालाबाल बचावले आहेत. मागील पाच दिवसात दोन बस व एक ट्रक या घाटात घसरून अपघात झाल्याची माहिती आहे.

जगप्रसिद्ध वेरूळ लेणी पाहण्यासाठी जी- २० चे शिष्टमंडळ येणार म्हणून लेणीकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली. डांबरीकरण करून रस्ता गुळगुळीत करण्यात आला. परंतु, अतिप्रमाणात डांबर व केमीकल वापरल्याने रस्ता धोकादायक बनला आहे. उन्हाळ्यात देखील हा रस्ता वाहनचालकांना त्रासदायक ठरला. मागील पाच दिवसांपासून पाऊस सुरू झाल्याने या गुळगुळीत रस्त्यावर वाहने चालवणे धोकादायक ठरत आहे. पावसाच्या पाण्यामुळे वाहने घसरून अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे.

गेल्या पाच दिवसात दोन बस व एक ट्रक घसरून अपघात झाले आहेत. मागील रविवारी स्मार्ट सिटीबसही घसरून दरीत कोसळता कोसळता वाचली. त्यानंतर शुक्रवारी वेरूळ लेणीसमोर पुलाजवळ आयशर ट्रक घसरला. तर आज सकाळी छत्रपती संभाजीनगर - नंदूरबार बस ( क्रमांक एम एच १४- बी टी २३६७ ) घाटातील गुळगुळीत रस्त्यावरून घसरली. बस रस्त्याच्या खाली उतरून बाजूच्या खडकामुळे थांबली. यामुळे बसमधील २४ प्रवासी बालाबाल बचावले आहेत. दरम्यान, राष्ट्रीय महामार्ग विभागाने या मार्गाची दुरुस्ती करण्याची मागणी प्रवास्यांनी केली आहे.





# नगराध्यक्षपदी गायत्री देशमुख तर उपनगराध्यक्षपदी निखिल देशमुख

आधुनिक केसरी न्यूज

**गणेश सुतार**

**सेनगाव :** सेनगाव नगरपंचायत तिच्या रिक्त झालेल्या नगराध्यक्ष उपनगराध्यक्ष यांची निवड प्रक्रिया आज 30 जून रोजी सेनगाव नगरपंचायत कार्यालयात पिठासीन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली यामध्ये प्रथम नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक प्रक्रिया करण्यात आली. यामध्ये नगराध्यक्ष पदासाठी राष्ट्रवादीच्या सौ.गायत्री गजानन देशमुख तर उपनगराध्यक्षपदी शिवसेना ठाकरे गटाचे निखिल देशमुख यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल महाविकास आघाडीच्या वतीने आनंद उत्सव साजरा करण्यात आला आहे. या निवडी दरम्यान अनेक राजकीय घडामोडींना चर्चना उधाण आले होते त्यामुळे ही निवडणूक निर्णयक ठरणार होती. अखेर त्या चर्चना पूर्ण विराम देत महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादीच्या कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवार सौ. गायत्री गजानन देशमुख यांची नगराध्यक्ष पदासाठी निवड करण्यात आली आहे. नगराध्यक्ष पदासाठी गायत्री देशमुख यांनी आपले नाम निदर्शनपत्र दाखल करण्यात आले होते तर भारतीय जनता पार्टी कडून राधा श्रीराम देशमुख यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला होता. नगराध्यक्ष उपनगराध्यक्ष राजकीय तडजोडीनुसार आपला राजीनामा दिला होता नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष या पदाची निवड प्रक्रिया आज दिनांक 30 जून रोजी झाली असून त्यामध्ये सेनगाव नगरपंचायतीच्या नगर अध्यक्षपदी राष्ट्रवादीच्या सौ.गायत्री गजानन देशमुख तर उपनगराध्यक्षपदी शिवसेना ठाकरे गटाचे निखिल देशमुख यांची निवड करण्यात आली असून त्यांचा सर्व मान्यवराच्या हस्ते जंगी सत्कार करण्यात आला आहे. सेनगाव नगरपंचायतीमध्ये महाविकास आघाडीची सत्ता आहे. सुरुवातीला सव्वा वर्षी नगराध्यक्ष पद हे शिवसेनाकडे उपनगराध्यक्ष पद हे राष्ट्रवादीकडे कॉंग्रेसकडे होते. अंतर्गत राजकीय समझो त्यानुसार अध्यक्ष उपनगराध्यक्ष यांनी आपले राजीनामा दिले होते त्यामुळे नगराध्यक्ष उपनगराध्यक्ष पदाची निवडणूक होऊ घातली होती अखेर आज रोजी 30 रोजी निवड प्रक्रिया ही शांततेत पार पडली असून पोलिसाच्या वतीने तगडा बंदोबस्त लावण्यात आला होता या निवडीनंतर नगराध्यक्ष उपनगराध्यक्ष या दोन्हीचाही सर्वप्रथम मान्यवरच्या हस्ते सत्कार करण्यात आला आहे. यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण जिल्हाप्रमुख संदेश देशमुख माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष अनिल पतंगे राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष रवींद्र गडदे नगरसेवक वैभव देशमुख प्रवीण महाजन इतर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. त्याचबरोबर जिल्ह्यातील व तालुक्यातील राजकीय मंडळी यावेळी उपस्थित होती सदर निवडणूक प्रक्रिया दरम्यान बंदोबस्त कामे सेनगाव पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक रंजीत भोईटे पोलीस उपनिरीक्षक अच्युत मूपडे शहर बीट जमादार सुभाष चव्हाण यांनी मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा फुलंब्री येथे भाजपातर्फे सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथून भोकरदन ते सिल्लोड या मार्गाने संभाजीनगर येथे जात असतानी भाजपा प्रदेश अध्यक्ष तथा आमदार चंद्रशेखरबावनकुळेसाहेब फुलंब्री येथे त्यांना थांबून त्यांचा भारतीय जनता पार्टीच्या वतीने फुलंब्री विधानसभा प्रमुख सुहासभाऊ शिरसाठ यांनी साहेबांचा सत्कार केला.

साहेबांनी विधानसभा प्रमुख सुहास शिरसाठ यांच्या खांद्यावर हात ठेवून सांगितलं खूप चांगलं चालू आहे फुलंब्री मध्ये मेहनतीचं फळ मिळणारच बूथ कमिट्या मजबूत करा शक्ती केंद्रप्रमुखांना चांगल मार्गदर्शन करा व त्यांनी फुलंब्री नगरपंचायत बघून खूप कौतुक केलं खूपच छान बिल्डिंग बांधली फुलंब्री शहराला व तालुक्याला निधी कमी पडू देणार नाही असे आश्वासन बावनकुळे साहेबांनी दिले आणि शासन आपलं आहे आता शासनाच्या माध्यमातून वेगवेगळ्या योजना राबवा व रात्री साहेबांनी युवा उद्योजक भगवान निराशे यांच्या हॉटेल आमदार अमृततुल्य चहाचा आस्वाद घेतला. या प्रसंगी भाजपा जिल्हा अध्यक्ष विजूभाऊ औताडे, भाजपा प्रदेश चिटणीस किरण जी पाटील, मा. संचालक रविंद्र काथार, भाजपा ओबीसी मोर्चा तालुका अध्यक्ष राम बनसोड, युवा शहराध्यक्ष वाल्मीक जाधव, ओबीसी मोर्चा तालुका कोषाध्यक्ष भगवान भाऊ निराशे, युवा नेते रंगाभाऊ भोईगळ, शिवसेना तालुका उपाध्यक्ष भरत भूमे, कृष्णा पात्रे, अरुण काथार, दिलीप शेरकर, पटेल जी, आकाश गोरावणे, अजय नागरे, पवन घोडके, विकास प्रधान, मयूर डांगे, अनिल प्रधान व मोठ्या संख्येने भाजपा कार्यकर्ते आणि मित्र मंडळ उपस्थित होते.



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर